सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, १२ फेब्रुवारी २०२५ वर्ष दुसरे अंक ३१८ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पंचवीस लाख 'लखपती दीदी' करण्याचे उद्दिष्ट : मुख्यमंत्री

### राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात 'उमेद मॉल' उभारणार, पहिल्या टप्प्यामध्ये १० मॉल उभारणार




मुंबई : 'महालक्ष्मी सरस' हा अत्यंत लोकप्रिय उपक्रम झाला आहे. राज्यभरातील बचत गटांना हक्काचे विक्रीचा साधन उपलब्ध व्हावे यासाठी प्रायोगिक तत्त्वावर दहा जिल्ह्यात दहा मॉल तयार करणार. टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात उमेद मॉल तयार करणार आहोत. त्याचं बरोबर राज्यात आगामी कालावधीत एक कोटी लखपती दीदी करण्याचा संकल्प आहे. सध्या राज्यात १८ लाख लखपती दीदी असून मार्चपर्यंत पंचवीस लाख लखपती दीदी करणार आहोत अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा, मुंबई येथे ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्यावतीने ११ ते २३ फेब्रुवारी दरम्यान सुरू राहणाऱ्या महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन - २०२५ चे उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, 'उमेद'चे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, उमेदचे मुख्य परिचलन अधिकारी परमेश्वर राऊत यांच्यासह राज्यभरातून बचत गटांच्या महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, 'महालक्ष्मी सरस' हा गेली २१ वर्ष अविरत सुरू असलेला उपक्रम आहे. 'उमेद' अभियानाच्या प्रगतीचा मी स्वतः साक्षीदार आहे. 'उमेदच्या' माध्यमातून 'महालक्ष्मी सरस' हा राज्यभरात महिला बचत गटांना एक हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा उपक्रम झाला आहे. महिला बचतगटांची उत्पादने खूप चांगली असतात. पण यांच्या विक्रीसाठी खूप उपाययोजना कराव्या लागतात. यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जिल्हा परिषदेच्या परिसरात उमेद अभियानाच्या माध्यमातून मॉल उभारणार. यासाठी आगामी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल. प्राथमिक स्तरावर दहा जिल्ह्यांत 'उमेद मॉल' उभारण्यात येतील, असे मुख्यमंत्री यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, बचत गटांमार्फत तयार केलेली वस्तू ही खाजगी कंपनीच्या मालापेक्षा अत्यंत उत्कृष्ट दर्जाची असून ती अत्यंत माफक दरात उपलब्ध होतात. 'उमेद'च्या माध्यमातून ६० लाखापेक्षा अधिक कुटुंब आर्थिक प्रगती करत आहेत. या माध्यमातून बचत गटातील महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'लखपती दीदी'ही योजना आणली आहे.ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त आहे त्यांना 'लखपती दीदी' म्हटले जाते. आज महाराष्ट्रात ११ लाख पेक्षा जास्त 'लखपती दीदी'आहेत. लवकरच २५ लाख महिलांना 'लखपती दीदी' करण्याचा शासनाचा मानस आहे. आगामी कालावधीत एक कोटी महिला लखपती दीदी करण्याचा संकल्प आहे. स्त्रीशक्ती ही आर्थिक विकासाला गती देणारी एक महाशक्ती होईल. बचत गटांच्या माध्यमातून ही चळवळ सुरू झाली आहे. शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी,लाडकी बहिण योजना, एस. टी. मध्ये प्रवास सवलत यासह अनेक महिला सक्षमीकरणाच्या योजना आणल्या आहेत.लाडका भाऊ म्हणून लाडक्या बहिणींच्या विकासासाठी सदैव पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री यांनी सांगितले.

ग्राम विकासमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. बचत गटांच्या माध्यमातून होणाऱ्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळवून देणे यासाठी शासन आग्रही आहे. महिला बचत गटांच्या उत्पादित माल विक्रीचे हमखास ठिकाण मिळावे यासाठी जिल्ह्याच्या महत्वाच्या ठिकाणी मॉल उभारणार. तालुक्यात देखील विक्री केंद्र सुरू करण्यात येतील. बचत गटांसोबतच वैयक्तिक कर्ज देण्यासाठी निर्णय झाला पाहिजे. आज उमेद अभियानाच्या माध्यमातून लाखो महिला सक्षम उद्योजिका म्हणून अनेक उत्पादनांची निर्मिती करत आहेत. त्यांनी तयार केलेली ही विविध उत्पादने देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचून त्यांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून दरवषी महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन आयोजित केले जाते या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन मंत्री गोरे यांनी सांगितले.

ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, 'उमेद'च्या माध्यमातून गेली २१ वर्षे सरसच्या माध्यमातून महिलांना खुली बाजारपेठ उपलब्ध करून महिलांना प्रोत्साहन दिले जाते. महिला अर्थिक स्वावलंबी झाल्या पाहिजेत. यामध्ये ६० लाखापेक्षा अधिक लाख कुटुंबे जोडली गेली आहेत. अजूनही यामध्ये सुधारणा करायला वाव आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना प्रत्येक जिल्ह्यावर मार्केटिंग व्हावे यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. 'महिला सरस'ला राज्यभरातून मिळणारा प्रतिसाद अत्यंत उत्स्फूर्त आहे.

### प्रदर्शन दि. ११ ते २३ फेब्रुवारी दरम्यान

सरस महालक्ष्मी या प्रदर्शनाला ११ ते २३ फेब्रुवारी, या कालावधीत भेट देता येईल. या प्रदर्शनात अनेक प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू, हातमागावर तयार केलेले कपडे, वुडन क्राफ्ट, बंजारा आर्ट, वारली आर्ट च्या वस्तू याशिवाय अनेक प्रकारच्या ज्वेलरी, लहान मुलांसाठी लाकडी खेळणी व इतर राज्यातील दुर्मिळ वस्तूंची रेलचेल आहे. या प्रदर्शनात एकूण ५०० पेक्षा जास्त स्टॉल लागले आहेत, त्यापैकी ९० फुड स्टॉल आहेत.

## सोन्याच्या दरात तेजी सुरुच



मुंबई : सध्या लग्न सराईचे दिवस सुरु असून या कालावधीत सोनं चांदीची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. मात्र गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका बसत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काल सोन्याच्या दरात काहीशी वाढ झाल्यानंतर आज पुन्हा सोन्याचे दर वाढले आहेत. आज मंगळवार (दि. ११) रोजी १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याच्या दरात ८७० रुपयांची वाढ झाली आहे. यामुळे हा दर ८७ हजार ०६० रुपयांवरुन ८७ हजार ९३० रुपये प्रति १० ग्रॅम इतका झाला आहे. तर ८ हजार ७०० रुपये प्रति १०० ग्रॅम इतकी वाढ झाली आहे. यामुळे १०० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा दर ८ लाख ७० हजार ६०० रुपयांवरुन ८ लाख १९ हजार ३०० रुपये इतका झाला आहे.

इतर शहरांमध्ये काय आहे सोन्याचा भाव?

मुंबई, पुणे, जळगाव, नागपूर, कोल्हापूर, सांगली, कोल्हापूर या ठिकाणी प्रति १० ग्राम २२ कॅरेट सोन्याचा दर ८० हजार ६०० रुपये आहे. तर २४ कॅरेट १० ग्राम सोन्याचा दर ८७ हजार ९३० रुपये आहे.

दरम्यान चैन्नई, कोलकाता, बंगळूरु, हैदराबाद या देशात १० ग्राम २४ कॅरेट सोन्याचा दर ८७ हजार ९३० रुपये तर २२ ग्राम ८० हजार ६०० रुपये आहे. नवी दिल्ली येथे १० ग्राम २४ कॅरेट सोन्याचा दर ८८ हजार ०८० रुपये तर २२ ग्राम ८० हजार ७५० रुपये आहे. तर अहमदाबाद येथे १० ग्राम २४ कॅरेट सोन्याचा दर ८० हजार ६५० रुपये तर २२ ग्राम ८७ हजार ९८० रुपये आहे.

## इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगसाठी दर निश्चित; प्रति युनिट १८ रुपयांचा खर्च

नाशिक : भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता महापालिका राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत (एनकॅप) दहा कोटींच्या निधीतून पहिल्या टप्प्यात शहरात वीस ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारत आहे. दिल्ली येथील सर्वोटेक कंपनीकडे हे काम आहे. दरम्यान महापालिकेच्या यांत्रिकी विभागाने इलक्ट्रिक वाहन चार्जिंग करण्यासाठी प्रति युनिट अठरा रुपयाचा दर ठरवला आहे.याबाबतचा प्रस्ताव महावित्तरणला दिला जाणार आहे.

नाशिक शहरात तीन खासगी चार्जिंग स्टेशन आहेत. त्याचे दरही अठरा रुपये प्रति युनिट असे आहे. त्यापेक्षा जादा दर ठेवल्यास वाहनचालक मनपा ऐवजी खासगी चार्जिंग स्टेशनला पसंती देतील. ही शक्यता लक्षात घेता विद्युत विभागाने १८ रुपये दर निश्चित केला आहे. महावितरणला हा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. दरम्यान मनपा इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन एका महिन्यात कार्यान्वित होणार असून वाहन चार्जिंगसाठी १८ रुपये प्रति युनिट दर ठरवले आहेत. वीसपैकी दोन चार्जिंग स्टेशन कार्यान्वित असून उर्वरीत स्टेशनचे काम महिनाभरात सुरु होईल. मनपा मुख्यालयाचे राजीव गांधी भवन, प्रमोद महाजन गार्डन या दोन ठिकाणी चार्जिंग स्टेशन सुरू झाले आहे. चार्जिंगसाठी दर किती आकारावे याबाबत मनपा विद्युत विभागाकडून इतर शहरांचा अभ्यास सुरु होता.यात पुणे, मुंबई, नागपूर, अहिल्यानगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर यांसह २१ शहरातील दरांची तपासणी करण्यात आली. साधारण १८ ते २४ रुपये प्रति युनिट असे दर आहेत.

येथे होणार चार्जिंग स्टेशन

मनपाचे सिडको विभागीय कार्यालय, सातपूर विभागीय कार्यालय, पंचवटी विभागीय कार्यालय, नाशिकरोड विभागीय कार्यालय, पूर्व विभाग कार्यालय, पश्चिम विभागीय कार्यालय, अमृतधाम फायर डेपो, सातपूर फायर स्टेशन, अंबड-सातपूर लिंकरोड, गणेशवाडी भाजी मार्केट, तपोवन, संभाजी राजे स्टेडियम, राजीव गांधी भवन, प्रमोद महाजन उद्यान, महात्मा नगर मैदान, कृषीनगर बॅडमिंटन हॉल.

## भारत आणि इस्रायल दहशतवादाविरुद्ध कटिबद्ध : पियुष गोयल

नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी : दहशतवाद हा भारत आणि इस्रायलचा समान शत्रू असून त्याचा नायनाट करण्याच्या सामायिक उद्देशाने दोन्ही देशांचे पंतप्रधान काम करतात असे प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी केले. ते आज, मंगळवारी नवी दिल्ली येथे भारतीय उद्योग महासंघद्वारे आयोजित इंडिया इस्रायल व्यापार मंचावर बोलत होते. गेल्या दशकात, सरकारने देशाच्या व्यापक आर्थिक मूलभूत गोष्टींना बळकटी देण्यावर लक्ष केंद्रित केले आहे आणि देशाच्या कानाकोपऱ्यात आर्थिक समृद्धी पोहोचवण्यासाठी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला आहे असे गोयल यांनी नमूद केले.

## 'तंत्रज्ञान नोकऱ्या खात नाही, याला इतिहास साक्षी'; मोदीचे एआय परिषदेत आवाहन



पॅरिस : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पॅरिसमध्ये सुरू असलेल्या एआय परिषदेत मोठी घोषणा केली. भारत आपल्या लार्ज लँग्वेज मॉडेल (मोठ्या भाषिक प्रतिमान) यावर काम करत आहे. त्याचबरोबर एआयवर आधारित ज्ञानाचा पूल तयार करत आहे, असे मोदी म्हणाले. यावेळी एआयशी संबंधित मुद्द्यांवर मोदींनी भाष्य केले. पॅरिसमधील एआय कृती परिषदेचा भारत सह-अध्यक्ष आहे.

एआय परिषदेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, एआय आता गरज बनले आहे. आमच्याजवळ जगातील सर्वोत्कृष्ट गुणवत्ता आहे. त्याचबरोबर आपल्यावर लोकांची माहिती सुरक्षित ठेवण्याची जबाबदारीसुद्धा आहे. यंत्रांची ताकद वाढत असल्याने काही लोक चिंतेत आहेत. पण, यात काळजी करण्यासारखं काही नाही.

एआयमुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील - मोदी

पंतप्रधान मोदी म्हणाले, एआय लाखो लोकांचे आयुष्य बदलत आहे. काळाबरोबर रोजगाराचे स्वरूपही बदलत आहे. आपल्याला एआयमुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संकटाकडेही लक्ष द्यावं लागेल.

तंत्रज्ञान नोकऱ्या खात नाही, याला इतिहास साक्षी आहे. एआयमुळेही नवीन नोकरीच्या संधी निर्माण होतील आणि आपल्याला नव्या संधीसाठी लोकांना तयार करावे लागेल, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले.

पंतप्रधान मोदी यांनी भाषणात भारताच्या एलएलएमबद्दलही (लार्ज लँग्वेज मॉडेल) माहिती दिली. भारत लवकरच आपले लार्ज लँग्वेज मॉडेल विकसित करेल, असे ते म्हणाले. भारताच्या एलएलएम मॉडेलची चर्चा होण्याची ही पहिली वेळ नाही. यापूर्वी केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही याबद्दल माहिती दिली होती. भारत लवकरच एलएलएम हे एआय मॉडेल विकसित करेल, असे त्यांनी म्हटले होते.

## कॉपीसाठी मदत करणाऱ्या शिक्षकांवर होणार कारवाई, मुख्यमंत्र्यांचे आदेश

मुंबई: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांना दहावी,बारावी परीक्षेत होणाऱ्या कॉपीबाबत नवीन आदेश दिले. दहावी,बारावी परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा, असे आदेश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी ( राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांच्याशी परीक्षेच्या तयारी बाबत आणि कार्यवाही करण्याबाबत संवाद साधला.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर आणि १०० मीटर परिसरात अनाधिकृत व्यक्तींना पूर्णत: प्रतिबंध करण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देतांना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य जवळ बाळगणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी.

भरारी पथकाव्दारे कॉपी मुक्त परीक्षेची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षीत आहे, अशा सूचना ही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. तसेच सर्व परीक्षा केंद्रावर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत विशेष बैठ्या पथकाची नियुक्ती करण्यात यावी, बैठया पथकाने परिक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास परिक्षा केंद्रावर पोहोचावे व परिक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका कस्टोडियनकडे जमा करेपर्यंत नियंत्रण ठेवावे, संवेदनशील केंद्रांवर कार्यक्षम व वरिष्ठ अधिका-यांची बैठया पथकात नेमणूक करावी. असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.सर्व तालुक्यातील परिक्षा केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त, बैठी पथके, ड्रोन व व्हिडीओ कॅमेरे कार्यरत असावेत. यावर निगराणी ठेवण्याकरिता जिल्हाधिका-यांनी प्रत्येक तालुक्याकरिता एक विभाग-प्रमुख, उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी, अशा सूचना दिल्या.इंग्रजी भाषा, गणित व विज्ञान विषयांच्या परीक्षेदिवशी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संवेदनशील केंद्रांना स्वत: भेटी द्याव्यात, असेही त्यांनी सांगितले. इयत्ता बारावीची परीक्षा मंगळवारी ११ फेब्रुवारीपासून १८ मार्चपर्यंतच्या कालावधीत राज्याच्या ३ हजार ३७३ परीक्षा केंद्रावर होणार आहे. दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च कालावधीत ५ हजार १३० परीक्षा केंद्रावर होणार आहे. यासाठी सर्व तयारी पूर्ण केली असल्याचे माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

## सायबर गुन्हे रोखण्यासाठी सरकार 'एआय' वापरणार

नवी दिल्ली, ११ फेब्रुवारी : सायबर गुन्हे रोखण्यासाठी केंद्र सरकार 'एआय'चा वापर करणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी 'सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्हे' या विषयावरील संसदीय सल्लागार समितीच्या बैठकीत ही माहिती दिली. सायबर गुन्हे बनावट बँक खात्यांद्वारे केले जातात. यामुळे बेकायदेशीर कारवाया वाढतात. सरकार 'एआय'च्या मदतीने अशा खात्यांवर कारवाई करेल असे शाह यांनी सांगितले. शाह यांनी समितीला सांगितले की, भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राच्या (आय-४सी) शिफारशींनुसार ८०५ ॲप्स आणि ३ हजार २६६ संकेतस्थळांच्या लिंक्स ब्लॉक करण्यात आल्या आहेत.

## कुंभमेळ्याहून परतताना बसची ट्रकला जोरदार धडक; ७ जणांचा जागीच मृत्यू, अनेक जखमी



जबलपूर : महाकुंभमेळ्याहून परतताना भाविकांच्या बसचा भीषण अपघात झाल्याची बातमी समोर आली आहे. मध्यप्रदेशातील जबलपूरमधील सिहोराजवळ बस आणि ट्रकची समोरासमोर जोरदार धडक झाली. या धडकेत बसचा चक्काचूर झाला असून ७ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अनेक प्रवासी जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी ९ वाजून १५ मिनिटांच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग ३०वर हा अपघात झाला. कुंभमेळ्याहून परतलेल्या भाविकांची बस बर्गी गावादरम्यान पोहोचताच समोरून येणाऱ्या ट्रकला धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी प्रशासन आणि पोलिसांचे पथक दाखल झाले असून तातडीने बचावकार्य सुरु करण्यात आले. तर बसमध्ये अजूनही काही प्रवासी अडकल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या घटनेवेळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. सिमेंटने भरलेला एक ट्रक विरुद्ध दिशेने येत असल्यामुळे हा अपघात घडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

दरम्यान, या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. त्यामध्ये बसच्या काही भागाचे तुकडे झाल्याचे दिसत आहे. तसेच स्थानिक लोक ट्रकच्या छतावर चढून प्रवांशाची मदत करत आहेत. घटनास्थळी क्रेन देखील पोहोचली आहे. या अपघातात आणखी कुणी बसमध्ये अडकले आहेत का? याचा तपास सुरू आहे.

## आता 'या' लाडक्या बहिणींना मिळणार दरमहा २,५०० रुपये!



नवी दिल्ली : महाराष्ट्रातील महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी सरकारने 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' सुरु केली. या योजनेद्वारे महिलांना दरमहा १ हजार ५०० रुपये दिले जात आहेत. तर ही रक्कम वाढवून लवकरच २ हजार १०० रुपये दिले जाणार असल्याची घोषणा देखील करण्यात आली आहे. दरम्यान या योजनेचा फायदा आता नवी दिल्लीतील महिलांना देखील होणार आहे.

सध्या दिल्लीच्या विधानसभा निवडणुकांचा निकाल जाहीर झाला असून भाजपा पक्षाने दणदणीत विजय मिळवला आहे. त्यामुळे दिल्लीमध्ये आता भाजपा सरकार स्थापन होणार असून अनेक योजनांमध्ये महत्त्वाचे बदल करणार आहेत. दिल्लीतील महिलांना आता लवकरच २५०० रुपये मिळणार आहे.

यापूर्वी आम आदमी पार्ट सरकार महिला सन्मान योजनेत दर महिन्याला १ हजार रुपये देत होती. मात्र, भाजप सरकारने २५०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आता दिल्लीतील महिलांना पुढील महिन्यापासून २ हजार ५०० रुपये दिले जाणार आहेत. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले होते की, आंतरराष्ट्रीय महिला दिवशी महिलांना २५०० रुपये देण्यास सुरुवात केली जाईल. आंतरराष्ट्रीय महिला दिन ८ मार्च रोजी साजरा केला जातो. त्यामुळे त्याआधी महिलांना हे पैसे मिळू शकतात.

## अंगणवाडी सेविका व मदतनीस रिक्त पदांच्या सरळ सेवा भरतीचा मार्ग मोकळा

### सोयगाव तालुक्यामध्ये १७ अंगणवाडी सेवकांची भरती सुरू

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.७ जानेवारी

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदाच्या भरतीवरील स्थगिती राज्य शासनाने उठविल्याने सोयगांव तालुक्यातील (प्रकल्प सोयगांव ग्रामीण अंतर्गत ) एकूण १७ रिक्त असलेल्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदाच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्याच्या महिला व बाल विकास विभागाने माहे जुलै २०२४ मध्ये अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदाच्या भरतीला स्थगिती दिली होती.त्यामुळे या दोन्ही पदांच्या रिक्त जागांची भरती प्रक्रिया प्रलंबित होती.आता राज्य शासनाने ३० जानेवारी २०२५ रोजी अंगणवाडी सेविका व मदतनीस भरती प्रक्रियेबाबत सुधारित नवीन शासन निर्णय जारी केला असून त्यात भरतीचे निकषही बदलण्यात आलेले आहेत.

अंगणवाडी सेविका व मदतनीस या दोन्ही पदासाठी शैक्षणिक पात्रता किमान १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.१२ वी पेक्षा जास्त शिक्षण पुर्ण केलेल्या अर्जदारास शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी २०२५ मध्ये नमूद परिशिष्ट अ नुसार अतिरिक्त गुण देण्यात येईल अतिरिक्त गुण मिळविण्यासाठी अर्जदाराने पदवी,पदव्युत्तर,डी.एड., बी.एड.एम.एस.सी.आय.टी.अथवा शासनाने ठरविलेल्या समकक्ष संगणक परीक्षा प्रमाणपत्र उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.तसेच विधवा अथवा अनाथ,मागास प्रवर्गातील,सेविका / मिनी सेविका / मदतनीस पदाचे किमान २ वर्ष अनुभव असणाऱ्या अर्जदाराला अतिरिक्त गुण देण्यात येईल.

सोयगांव तालुक्यात अंगणवाडी सेविका ०६ तर मदतनीस ११ पदे रिक्त आहेत.

राज्य शासनाने या पद भरतीला हिरवा कंदील दाखवल्याने ही १७ रिक्त पदे आयुक्त यांची परवानगी मिळाल्यामुळे भरली जाणार आहे. त्यामुळे अंगणवाडीत येणाऱ्या बालके लाभार्थी यांची गैरसोय दूर होणार आहे.

सोयगाव तालुक्यातील ( ग्रामीण प्रकल्प अंतर्गत) रिक्त असलेल्या धाप, रवळा, सावळदबारा, दस्तापुर, काळदरी, सावंतवाडी , किन्ही, बनोटी, हनुमंतखेडा, गलवाडा-अ ,फर्दापूर येथील प्रत्येकी एक मदतनीस पदासाठी तसेच निंबायती, तिखी, पोहरी बुद्रुक, वनगांव , माळेगांव, नांदा तांडा येथील प्रत्येकी एक अंगणवाडी सेविका पदासाठी सोयगांव प्रकल्प कार्यालयाने जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज स्विकारण्याची तारीख ५ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी पर्यंत सुटीचे दिवस वगळून नियोजित केली आहे.तरी सदरील महसुली गावातील पात्र असलेल्या महिला अर्जदारांनी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे.अर्जाचा नमुना अंगणवाडी सेविका / प्रकल्प कार्यालय येथे उपलब्ध आहे

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पामधील ज्या प्रकल्पांमध्ये शासन निर्णयापूर्वीच्या निकषांनुसार जाहिरात देऊन निवड समितीने निवडलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना नियुक्तीचे आदेश निर्गमित केले आहेत. त्याचप्रमाणे निवड समितीने अंतिम केलेली गुणवत्ता पडताळणी यादी प्रकल्प कार्यालयाने प्रसिद्ध केलेली प्रकरणे वगळून उर्वरित कोणत्याही टप्प्यावर स्थगित ठेवण्यात आलेली भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्याऐवजी नव्याने जाहिरात देऊन सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात यावी, असे आयुक्त एबाविसेयो महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांच्या ३१ जानेवारीच्या पत्रात म्हटले आहे.

## चौफेर



# आग्नेय आशियात भारतीय संस्कृतीचा संचार

व्यापार-उदीम, धर्मप्रसार, राज्यविस्तार इ. निमित्तांनी इ. स. दुसऱ्या शतकापासून इ. स. तेराव्या शतकाच्या दरम्यान भारतीय राजांनी अतिपूर्वेकडील देशात विशेषतः आग्नेय आशियात वसाहती व राज्ये स्थापन करून भारतीय संस्कृतीचा प्रसार व प्रचार केला. या विस्तारकार्यात भारतीय सागरी व्यापारी वर्गाने महत्वाची कामगिरी बजावली. या भारतीय संस्कृतीच्या प्रभावाखाली देशांचा निर्देश 'बृहद्‌भारत' किंवा 'बृहत्तर भारत' या संज्ञेने करण्यात येतो. हा संस्कृती प्रसाराचा स्त्रोत कंबोडिया व कंबुज (कांपुचिया), ब्रह्मदेश, मलाया, सुमात्रा, जावा, बाली (इंडोनेशिया), सयाम (थायलंड), लाओस, बोर्निओ इ. प्रदेशात मुसलमानांच्या आक्रमणापर्यंत अखंडितपणे चालू होता.

बृहद्?भारताच्या प्राचीन इतिहासाची माहिती मुख्यत्वे पुढील साधनांद्वारे उपलब्ध झाली आहे: (१) प्राचीन स्मारके उदा., बोरोबूदूर, अंकोरवात, बांटी श्री इत्यादी प्राचीन मंदिरे, तसेच स्तूप, विहार, शिलालेख, ताम्रपट इ. (२) उत्खननांद्वारे उपलब्ध झालेले अनेक प्राचीन अवशेष आणि (३) अभिजात लेखकांचे तसेच परदेशीय प्रवाशांचे वृत्तांत. चौथ्या ते सातव्या शतकांत कोरलेले अनेक संस्कृत शिलालेख, थायलंड, मलाया, सुमात्रा बाली, जावा व बोर्निओ येथे सापडले असून प्राचीन चंपासारख्या लहान राज्यात पन्नास व कंबोडियात १५० शिलालेख मिळाले. याशिवाय तत्कालीन वाङ्‌मय व कायदेविषयक ग्रंथ तसेच परदेशीय व्यापारी व प्रवासी यांनी लिहिलेले वृत्तांत ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहेत.

### राजकीय इतिहास

अतिपूर्वेकडील भारतीयांच्या वसाहतींबद्दल चिनी इतिहासावारून माहिती मिळते. जावा, सुमात्रा व मलाया यांच्याशी फार प्राचीन काळी भारताचा संबंध आला, हे स्पष्ट आहे. कारण पुराणांमध्ये मलाया द्वीपकल्पाचा सुवर्णद्वीप म्हणून उल्लेख आढळतो. बोर्निओबाबतची माहिती त्रोटक असली, तरी तेथील संस्कृती निःसंशय भारतीय आहे.

सुमात्रामध्ये सातव्या व्या शतकात व्यापारी साम्राज्य निर्माण झाले. येथे श्रीविजय (विद्यमान पालेंबांग) हे सामर्थ्यशाली राज्य होऊन गेले. भारत व चीन दरम्यानच्या व्यापारी दळणवळणाच्या मार्गावरचे हे मोक्याचे स्थान असल्यामुळे श्रीविजय राज्याने व्यापारी क्षेत्रात वर्चस्व स्थापून पश्चिम जावा-मलावू जिंकले प्रांतांवर प्रांताधिकारी नेमले. बंडाळी करणाऱ्यांना शासन केले. हे राजे बौद्ध धर्मीय होते. श्रीविजय हे मलायाच्या द्वीपकल्पातील राजकीयच नव्हे तर सांस्कृतिक केंद्र झाले होते. या सुमारास मध्य जावातील शैलेंद्र आणि श्रीविजयचा राजा या दोन्ही सत्ता धर्मसेतूनंतर एक झाल्या. त्यांनी चंपा व कंबुजवर वर्चस्व प्रस्थापित केले. शैलेंद्र राजांनी श्रीलंकेवरही आक्रमण केले होते. मलाया राज्याची स्थापना पहिल्या शतकातच झाली असावी.

चवथ्या-पाचव्या शतकांत तक्कोलसारखी राज्ये होऊन गेली त्यांचे व फूनानचे सांस्कृतिक संबंध होते. सातव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत मलाया हे श्रीविजय घराण्याच्या वर्चस्वाखाली होते. तेराव्या शतकात सयामच्या थाई घराण्याने आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांनी आणि जावातील नव्या राजांनी श्रीविजयचे राज्य नष्ट केल्यामुळे आपोआपच मलायाच्या इतिहासातील महत्त्वाचे पर्व संपले.

चिनी इतिहासकारांनी उल्लेखिलेले पोली म्हणजे बाली होय. सहाव्या-सातव्या शतकांतील बालीचा इतिहास ज्ञात नाही. त्यानंतरच्या इतिहासासंबंधी ताम्रपटांवरून माहिती मिळते. येथे उग्रसेन, श्रीकेसरीवर्मदेव, धर्मवंश, उदयन, महेंद्रदत्ताराणी (गुणप्रियाधर्मपत्नी) आणि धर्मोदयवर्मन हे राजे होऊन गेले. बाराव्या शतकात श्री शूराधिप व श्री जयशक्ती या दोन राजांचा उल्लेख मिळतो. 'पदुका श्री महाराज हाजी जय पंगुस' हा सप्तमंडळावर (बाली द्वीपमंडळ) राज्य करतो असा उल्लेख आहे. बालीने जावातील बंडाळीचा व कूब्लाईखानाच्या आक्रमणाचा फायदा घेऊन स्वातंत्र्याची घोषणा केली. पुढे सुमारे पन्नास वर्षे बाली स्वतंत्र होता. जावातील प्रजा बालीत येऊन स्थायिक झाली. एकोणिसाव्या शतकात डचांनी बाली जिंकून घेतले.

### फूनान

भारतीय संस्कृतीचा पहिला आविष्कार फूनान या इंडोचायनामधील भागात झाला. फूनानचे राज्य इसवी सनाच्या पहिल्या शतकात कौण्डिण्य नावाच्या एका भारतीय ब्राह्मणाने स्थापन केले. त्याने नागकन्या सोमा हिच्याशी विवाह करून नव्या वंशाची स्थापना केली. त्याच्या एका वंशजाने (ह्यूएन बान हवांग) ९० वर्षांचा होईपर्यंत राज्य केले. यानंतर बान-बान, फान-ची-मान इ. पराक्रमी राजे झाले. त्यांनी दहा राज्यांवर आक्रमण करून सत्ता वाढविली आरमार सुसज्ज केले व सर्वांना मांडलिक बनविले मेकाँग-दोन्नाइ दोआब व कामरांगचा उपसागर हे प्रदेश त्याच्याच राज्यात होते. त्याने जवळजवळ सर्व सयाम, कंबोडिया व मलायाचा काही भाग जिंकून घेतला होता.

फान- ची मॉननंतर फान चँग (कार. इ. स. २२५ ते २५०) या त्याच्या सेनापतीने २५ वर्षे राज्य केले. त्याने आपले वकील भारतात पाठविले होते. नंतरच्या फान-सिऊनच्या दरबारी चीनमधून वकील आले होते. फूनानच्या सर्व शहरांना कोट होते. शहरात राजवाडे, ग्रंथालये व दफ्तरखाने होते. सोने, चांदी, मोती, अत्तर या रूपांत कर दिले जात. फान सिऊनने इ. स. २८७ पर्यंत राज्य केले. त्याने चंपाचा राजा फान सीऊंग याच्याशी सख्य करून टाँकिन या चिनी प्रांतावर आक्रमण केले. येथून पुढे पाऊणशे वर्षांपर्यंतचा फूनानचा उल्लेख सापडत नाही. नंतर चंदन याचा उल्लेख आढळतो. त्याने चीनला वकील पाठविले होते. चौथ्या शतकात कौण्डिण्य नावाचा दुसरा एक ब्राह्मण, पहिल्या कौण्डिण्याप्रमाणेच, 'ईश्वरी संकेत' मिळाल्यामुळे फूनानला येतो, अशी एक दंतकथा प्रचलित आहे. फूनानचे लोक त्याला राजा करतात. या दुसऱ्या वसाहतीने फूनानला संपूर्ण भारतीय करून टाकले. यानंतरच्या राजांची नावे पूर्णतः भारतीय आढळतात. इंद्रवर्मन् (श्रेष्ठवर्मन्) याने चिनी बादशहाकडे वकील पाठविले. यानंतरचा दुसरा राजा जयवर्मन् याचे नाव संस्कृत शिलालेखात सापडते. याने इ. स. ४८४ ते ५१४ पर्यंत राज्य केले. फूनानमधील चेन-ला राज्याचे मांडलिक राजे बलवान झाल्यामुळे त्यांच्या पुढे फूनानची सत्ता टिकाव धरू शकली नाही. दंतकथेनुसार कंबुज राज्याचा संस्थापक कंबू स्वयंभू हा आर्यदेशाचा (भारत) राजा होता व कंबोडियास तो जीव देण्याच्या हेतूने गेला होता. तेथे एका नागराजाने जीव देण्यापासून परावृत्त करून आपल्या कन्येशी त्याचा विवाह लावला. या दोघांनी नवा वंश स्थापन केला.

कंबोडियाचा संस्थापक कौण्डिण्य. चेन-लाच्या गादीवर प्रथम आलेल्या भववर्मनच्या कारकीर्दीत राज्याच्या सीमा वाढू लागल्या. यानंतर महेद्रवर्मनब व ईशवर्मनब यांनी पश्चिमेकडे राज्य वाढविले. वायव्य कंबुजमधील चक्रकंपुरा, अमोघपुरा आणि भीमपुरा या तीन प्रदेशांत व द्वारावतीपर्यंत आपली सत्ता प्रस्थापित केली. यानंतर पहिला जयवर्मन् याने ४० वर्षे राज्य केले. याने लाओसचा बराचसा भाग जिंकून घेतला. त्याच्या मृत्युनंतर जवळजवळ शतकभर अराजक माजले. चेन-लाची दोन वेगवेगळी राज्ये झाली. दक्षिण चेन-लावर श्रीविजयच्या राजाने आक्रमण केले.

दुसरा जयवर्मन्? इ. स. ८०२ मध्ये राज्यावर आल्यावर त्याने चेन-लाच्या राज्याची विस्कटलेली घडी परत नीट बसविली. इंद्रपूर हि त्याची राजधानी होती. त्याने हरिहरालय हे नगर वसविले. यानंतर तिसरा जयवर्मन् व यशोवर्मन् हे महत्त्वाचे राजे झाले. पाचवा जयवर्मन् (कार. इ. स. ९६८-१००१) याने बांटी श्रीचे सुंदर देवालय बांधले. दुसऱ्या सूर्यवर्मनने अंकोरवातची जगप्रसिद्ध अमर कलाकृती निर्माण केली. ख्मेर काळच्या वैभवाचे हे अमर स्मारक होय. याच काळात चंपा व कंबुज यांच्यामधील संबंध बिघडले. कंबुजच्या राजांनी सत्ता बळकट करून चंपाचा पराजय केला. पंधराव्या शतकात सयामच्या थाई लोकांचे आक्रमण सुरू झाल्यावर या राज्याचा ऱ्हास झाला. फूनानच्या ऱ्हासानंतर आग्नेय आशियात राजकीय पोकळी निर्माण झाली. फूनानबरोबर फूनानचे आरमारही नष्ट झाले व एक व्यापारी साम्राज्य कोसळले. ही उणीव सुमात्रामध्ये सातव्या शतकात श्रीविजयच्या साम्राज्याने भरून काढली.

(संकलित)

## घरवापसी

कुलदीपसिंह



# कांकेरमधील ११ कुटुंबांनी स्वीकारला हिंदू धर्म

बाबा बागेश्वर धाम पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्तीसगडमध्ये धर्मांतरामुळे लोकसंख्येच्या असमतोलावर चिंता व्यक्त केली. राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये लोकसंख्येची रचना (डेमोग्राफी) बदलली आहे आणि त्यामुळे फुटीरतावादी वृत्ती वाढून अराष्ट्रीय तत्त्वांना चालना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

सनातन वेदप्रणीत हिंदू धर्माचा महिमाच असा आहे की जो त्याच्या संपर्कात येतो, तो हा धर्म जाणून घेण्याचा, समजून घेण्याचा प्रयत्न करतो आणि शेवटी या सनातन धर्माचाच एक भाग होऊन राहतो. छत्तीसगडमधील कांकेरमध्ये पुन्हा एकदा याचीच पुनरावृत्ती झाली आहे. येथे बाबा बागेश्वर धाम पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्यानंतर लोक इतके प्रभावित झाले की त्यांनी पुन्हा सनातन धर्मात अर्थात हिंदू धर्मात परतण्याचा निर्णय घेतला.

माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, कांकेरमध्ये हिंदू एकता शतचंडी महायज्ञा दरम्यान भाजपा नेते प्रबलप्रताज जुदेव यांनी या ११ कुटुंबांना सनातन धर्मात परतण्यासाठी मदत केली. यावेळी बाबा बागेश्वर धाम पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्तीसगडमध्ये धर्मांतरामुळे निर्माण झालेल्या लोकसंख्येच्या असंतुलनावर चिंता व्यक्त करीत राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये लोकसंख्येची रचना (डेमोग्राफी) बदलल्याचे सांगितले. हिंदूंवर अत्याचार होत आहेत. परिस्थिती अशी आहे की या जिल्ह्यांमध्ये पूर्वी जे हिंदू बहुसंख्य होते ते आता अल्पसंख्यक झाले आहेत.

### भारताला हिंदू राष्ट्र बनवावे लागेल

बाबा बागेश्वर धाम यांनी भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची प्रकर्षाने मागणी केली. ते म्हणाले, आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की चंगाई सभा आणि लव्ह जिहादसारख्या दुष्ट प्रथांविरुद्ध संपूर्ण सनातन समाजाला एकत्रित प्रयत्न करावे लागतील.

प्रबल प्रताप जुदेव म्हणाले की, इतिहास साक्षी आहे की जेव्हा-जेव्हा हिंदूंचे धर्मांतर झाले, तेव्हा तो भाग भारतापासून वेगळा झाला. त्यामुळे जोपर्यंत माझ्या शरीरात प्राण आहे, तोपर्यंत मी माझ्या वडिलांप्रमाणे घरवापसी मोहीम नेटाने राबवत राहीन, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्रबल प्रताप जुदेव, कांकेरचे खासदार भोजराज नाग, माजी खासदार मोहन मडावी, विद्यमान आमदार आशाराम नेताम यांनी सर्व कुटुंबीयांचे पाय धुवून सनातन धर्मात स्वागत केले.




# १५ ख्रिश्चन कुटुंबांचा हिंदू धर्मात प्रवेश

**सनातन** धर्माचा महिमाच असा आहे की तो मार्ग भरकटलेल्या लोकांनाही आपल्या मुळांशी जोडतो. अशीच एक घटना बिहारच्या नवादा जिल्ह्यात घडली आहे. येथे १२-१५ कुटुंबातील ख्रिश्चन नागरिकांनी पुन्हा आपल्या मूळ हिंदू धर्मात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. या लोकांना आमिष दाखवून, फसवून मिशनऱ्यांनी त्यांचे ख्रिश्चन धर्मात धर्मांतर घडवून आणले होते. मात्र, आता ते सगळे मूळ सनातन धर्मात प्रवेशले आहेत.

### काय आहे संपूर्ण प्रकरण?

प्रकरण असे की, नवादा जिल्ह्यातील रोह ब्लॉकमधील समरीगड पंचायतीचे रहिवासी रविदास समाज औक महादलित समजले जाणारे मुसहर समाजाच्या लोकांनी घरवापसी केली आहे. आपण आधी हिंदू होतो, पण नंतर काही वर्षांपूर्वी ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या संपर्कात आलो. मिशनऱ्यांनी आम्हाला चांगले शिक्षण, अन्न, रहायला घर इत्यादी आमिषे दाखविली आणि आमचे धर्मांतर घडवून आणले. पण लवकरच आमचा भ्रमनिरास झाला. मिशनऱ्यांनी आमची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. त्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण केली नाही, असे या लोकांनी सांगितले. मिशनऱ्यांनी आमची दिशाभूल केल्याचे आमच्या लक्षात आले आणि पुन्हा मूळ सनातन हिंदू धर्मात परतण्याची तीव्र इच्छा मनात जागृत झाली, असेही मुसहर समाजाच्या या नागरिकांनी सांगितले. ही इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांनी हिंदू संघटनांशी संपर्क साधला. यानंतर हिंदू संघटनेच्या लोकांनी मंदिरात आयोजित एका विशेष सोहळ्यात त्यांना पुन्हा हिंदू धर्माची दीक्षा दिली. यावेळी होमहवन वगैरे होऊन शुचिर्भूत होऊन त्यांची घरवापसी प्रक्रिया पार पडली.

घरवापसी केलेले सर्व लोक समरीगड गावातील देवी मंदिरात जमले आणि सर्वांनी आपली चूक कबूल करून आमिषाला बळी पडून आपण ख्रिस्ती झाल्याचे सांगितले. गुरू गोविंदसिंग आमचे श्रद्धास्थान य जींचे विश्वासू आहोत, ज्यांअसल्याचे त्यांनी सांगितले. मोगलांनी त्यांच्या मुलांना भिंतीत चिणून मारले. पण त्यांनी इस्लाम स्वीकारला नाही. गुरू गोविंद सिंग यांच्याकडून प्रेरणा घेऊन आम्ही पुन्हा आमच्या मूळ सनातन धर्मात प्रवेशल्याचे रविदास व मुसहर समाजाच्या लोकांनी सांगितले. सनातन धर्म हा जगातील सर्वांत महान धर्म आहे, असेही ते म्हणाले. सनातन हिंदू धर्म स्वीकारलेल्यांमध्ये दिलीप रविदास, भरत रविदास, कुंदन रविदास, वीरेंद्र रविदास, रवी रविदास, संजू रविदास, जगदीश रविदास, सौरभ रविदास, छोटालाल मांझी, चिंता देवी आणि तब्या देवी यांच्यासह दोन डझनहून अधिक लोकांचा समावेश आहे.

# मुस्लिम युवकाचा सनातन धर्मात प्रवेश

**वाराणसी :** काशीमध्ये एका मुस्लिम तरुणाने स्वेच्छेने हिंदू धर्म स्वीकारून घरवापसी केली. धर्मांतरानंतर भोगाबीर लंका निवासी अब्दुल हकीम यांचा पुत्र महमूद आलम याने आपले नाव बदलून गुड्डू लाल असे ठेवले. धर्मपरिवर्तनानंतर आपण खूप आनंदी असल्याचे या तरुणाने सांगितले. सनातन धर्म स्वीकारण्याचा विचार गेल्या १० वर्षांपासून आपल्या मनात होता. सनातन धर्माकडे माझा ओढा सतत वाढत होता. अखेर आपण हिंदू धर्म स्वीकारून मनातली इच्छा पूर्ण केल्याचे महमूद आलम याने सांगितले. माझ्यावर कुणीही सक्ती केली नाही व हा निर्णय घेताना माझ्यावर कुठल्याही प्रकारचे दडपण नव्हते, असेही गुड्डू लाल याने सांगितले. आपण सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच धर्मांतर केल्याचे महमूद आलम ऊर्फ गुड्डू लाल याने सांगितले. घरवापसीपूर्वी मंत्रोच्चार आणि हवनासह संपूर्ण वैदिक विधींनी सनातन धर्म



स्वीकारण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

घरवापसी प्रक्रियेत गीतेची शपथ आणि अग्नीला साक्षी मानून महमूद आलमने सनातन धर्मात प्रवेश केला आहे. त्याच्या घरवापसीचा व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा युवक आई-वडिलांपासून वेगळा राहत असून भोगाबीर लंका परिसरात दुकान चालवतो. वास्तविक आपण २५ ऑगस्ट २०२० रोजीच हिंदू धर्म स्वीकारला होता. याबाबत न्यायालयात अपील करण्यात आले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात मधली तीन-चार वर्षे गेली. यासंदर्भात वृत्तपत्रात राजपत्रही काढण्यात आले. डिसेंबर २०२४ मध्ये धर्मांतराची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली. यानंतर मी घरी पूजाअर्चना करत असे. माझ्या मित्रांनी बीएचयूमध्ये घरवापसी निमित्त विशेष सोहळ्याचे आयोजन केले होते, असेही महमूद आलम ऊर्फ गुड्डू लाल याने सांगितले.

(पांचजन्यवरून साभार)



# अनादि, ऐतिहासिक महाकुंभमेळा

भाग ४

## संस्कृती

साधू-संतांच्या मेळा क्षेत्रातील प्रवेशानंतरच कुंभोत्सव सुरू होतो. आखाड्यांमध्ये, विशेषत: श्री पंचदशनाम जुना आखाड्याचे संन्यासी नेहमीच चर्चेचा विषय ठरतात आणि शैव मतावलंबी दशनामी आखाड्याचे साधू प्राधान्य क्रमाने प्रथम स्नान करतात. कुंभपर्वावर, शैव (नागा संन्यासी), वैष्णव (वैरागी मुंडी), उदासी आणि निर्मल या साधू-संन्याशांना चार श्रेणींमध्ये पाहिले जाऊ शकते.

कुंभमेळ्यात हठयोगी, शारीरिक क्रियांचे प्रदर्शन करणारे साधू आणि तपश्चर्या अथवा ध्यान साधनेत तल्लीन झालेले संन्यासी हेही यात्रेकरूंच्या आकर्षणाचे मुख्य केंद्र असतात. कौटुंबिक बंधनांचा त्याग केलेल्या या संतांकडे हिंदू नागरिक आदराच्या दृष्टीने पाहतात आणि 'सिद्धी'साठी भटकंती करणारे, स्वर्गात स्थान मिळवण्याची कामना बाळगणारे, ऐहिक-सांसारिक सुखांची इच्छा बाळगणारे या सर्वसंगपरित्याग केलेल्या या संतांचे आशीर्वाद प्राप्त करण्यास उत्सुक असतात. हे संत आपल्या आखाड्यांमध्ये आपली परंपरा आणि धार्मिक उपासना, पूजा पद्धतीनुसार राहतात आणि कुंभमेळ्याच्या



विशेष स्नान पर्वात शाही मिरवणुकीत सामूहिक स्नानासाठी नदीकाठावरून यात्रा करतात. शाही मिरवणुकीत आखाडे, साधू-संन्यासी आणि धर्माचार्य पारंपरिक पद्धतीने बँडबाजा, चांदीचे हौद, छत्रचामर, पालखी, रथ आणि आकर्षक वस्त्रे घालून बाहेर पडतात. शाही मिरवणुकीत नग्न फिरणाऱ्या साधू-संतांची एक लांब रांग पाहायला मिळते, जी कुंभमेळ्याचे मुख्य आकर्षण असते.

साधू-संतांच्या मेळा क्षेत्रातील प्रवेशानंतरच कुंभोत्सव सुरू होतो. आखाड्यांमध्ये, विशेषत: श्री पंचदशनाम जुना आखाड्याचे संन्यासी नेहमीच चर्चेचा विषय ठरतात आणि शैव मतावलंबी दशनामी आखाड्याचे साधू प्राधान्य क्रमाने प्रथम स्नान करतात. कुंभपर्वावर, साधू-संन्याशांना चार श्रेणींमध्ये पाहिले जाऊ शकते. शैव (नागा संन्यासी), वैष्णव (वैरागी मुंडी), उदासी आणि निर्मल.

### शैव अनुयायी (नागा संन्यासी) त्यांचे पुढीलप्रमाणे आखाडे आहेत...

१. श्री तपोनिधी निरंजनी आखाडा, पंचायती २. श्री पंचायती आनंद आखाडा, ३. श्री पंच दशनाम जुना आखाडा, ४. श्री पंच आवाहन आखाडा ५. श्री अग्नि आखाडा ६. पंचायती आखाडा महानिर्वाणी ७. श्री पंच अटल आखाडा.

### वैष्णव अनुयायी (वैरागी) साधूंचे आखाडे

८. निर्मोही आखाडा ९. दिगंबर आखाडा १०. निर्वाणी आखाडा.

### उदासी

११. नवीन पंचायती उदासीन आखाडा १२. बडा पंचायती उदासीन आखाडा

१३. निर्मल आखाडा

या आखाड्यांची एक मध्यवर्ती संघटना असून तिला 'आखाडा परिषद' असे म्हणतात. कुंभ उत्सवाकडे मेळा म्हणून पाहिल्यास असे म्हणता येईल की, साधू-संन्यासी हे कुंभमेळ्याचे केंद्र आहेत आणि त्या आधारावर असे म्हणता येईल की, कुंभोत्सवात साधू नाही तर कुंभ नाही.

### कुंभमेळ्याची सांस्कृतिक प्रेरणा

कुंभमेळ्याच्या निमित्ताने राष्ट्रीय कामगिरीचे प्रदर्शन आणि परिसंवाद, चर्चासत्रेही आयोजित केली जातात. देशाच्या प्राचीन आणि नवीन स्वरूपाची ओळख करून देणारे विविध राष्ट्रीय कार्यक्रमही आयोजित केले जातात. प्रयागराजचा महाकुंभमेळा देशाला एक नवा संदेश देत आहे. हिमालयाच्या पर्वतरांगांच्या संदर्भात गंगेची धवल अमृतधारा आमच्या सांस्कृतिक एकतेचा संदेश देत आहे. आम्ही एक आणि अखंड आहोत याचीही घोषणा या महान उत्सवात आपोआप होते. विविधता असूनही सांस्कृतिक एकतेचे हे महापर्व भारतीयांच्या त्या अमर कामनेचे परिचायक आहे की मृत्यूलोकात असूनही आम्ही अमरत्वाची साधना करतो. अमृतमंथनाच्या वेळी सूर्य, चंद्र आणि बृहस्पती यांनी अमृत कलशाचे रक्षण करण्यास सहकार्य केले होते. हे सहकार्य आम्हाला राष्ट्रीय साधनांचे संशोधन व त्यांच्या परोपकारी कामगिरीची देखील प्रेरणा देते. भारत महान देश आहे. निसर्गाने त्याला आपले वरदान दिले आहे. त्या वरदानाचा लाभ 'सर्वजन हिताय आणि 'सर्वजन सुखाय' अशा प्रकारे झाल्यास कुंभमंळ्याचे सार्थक राहील. कुंभमेळा आम्हाला प्राचीन आणि नवीन यांच्या समन्वयाची देखील प्रेरणा देतो.

### संदर्भग्रंथ


१. संकलक रामानंद, कुंभ: सर्वजन-सहभागिता का विशालतम अमृतपर्व, पिलग्रिम्स पब्लिशिंग, वाराणसी, प्रथम संस्करण २०१३

२. वेदाचार्य प. श्री वेणीराम शर्मा गौड, कुंभपर्व महात्म्य, वणिक प्रेस, मनमंदिर, काशी, पहिली आवृत्ती सं. २००४

३. श्री वैद्यनाथ अग्निहोत्री, कुंभ-महापर्व और उसका माहात्म्य

सोलापूर तरुण भारत — न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ॲमेझॉन आणि डीजीएफटी यांच्यातील सहकार्याचा विस्तार

छत्रपती संभाजीनगर : ॲमेझॉन आणि परराष्ट्र व्यापार महासंचालनालय (डीजीएफटी) यांनी आज भारतातील ई-कॉमर्स निर्यातीला गती देण्यासाठी आपसांतील सहकार्याचा विस्तार जाहीर केला. या दोन्ही संस्थांमध्ये नोव्हेंबर २०२३मध्ये प्रारंभिक सामंजस्य करार झाला होता, त्यावर हा विस्तार आधारित आहे. सरकारच्या जिल्हा निर्यात हब उपक्रमाचा लाभ घेऊन सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) निर्यातीला चालना देणे हा या कराराचा उद्देश होता. नूतनीकरण झालेल्या सहकार्यातून संपूर्ण भारतातील एमएसएमईंना ई-कॉमर्स निर्यातीत यशस्वी होण्यासाठी आवश्यक ती कौशल्ये आणि संसाधने उपलब्ध करून देण्यात येतील.

## खात्यावर चूकुन आलेले ३ लाख रुपये केले परत



तभा वृत्तसेवा

पैठण दि ११ :-पैठण तालुक्यातील पिंपळवाडी पिराची येथील इम्रान शेख यांनी पत्नीच्या बँक खात्यावर चुकून आलेले तीन लाख रुपये केले दि.९ रविवार रोजी बँकेत केले परत.

सध्याच्या जगात माणूस पैशाला फार महत्त्व देतो. काही रुपयांसाठी भांडणतंटे होऊन त्यातुन काही गंभीर घटना घडल्याचे देखील उदाहरणे असताना पिंपळवाडी (पिराची) ता.पैठण येथील इम्रान शेख यांनी पंधरा दिवसांपुर्वी चुकुन पत्नी तनजीला शेख यांच्या बंधनं बँक पैठण येथील शाखेतील बँकेतील खात्यावर आलेले ३ लाख १२ हजार रूपये पैठण येथील समता पतसंस्था ला कोणताही स्वार्थ मनात ठेवता पतसंस्थेचे अधिकारी एडके यांना दि.९ रविवार रोजी सकाळी पैठण येथे पत्नीच्या खातेचा ३ लाख १२ हजार रूपयाचा धनादेश देऊन माणुसकीचे दर्शन घडवले.त्यामुळे सर्वत्र इम्रान शेख व त्यांच्या परीवाराच्या इमानदारीचे कौतुक होत आहे.

## दांडी पौर्णिमा निमित्त सिल्लोड ते जयदेव वाडी जादा बसची मागणी



सिल्लोड प्रतिनिधी : दांडी पौर्णिमा जयदेव वाडी येथे राज्य व इतर राज्यातून भाविक येत असतात भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून महंत खडकुलीकर बाबा महंत श्री बायराज बाबा मा. इ श्री दिगंबर दादा आंबेकर रतन सिंग पाटील सुरेश शेठ मोरे गोपाल निकम श्यामपरे दत्तू पाटील ढोरमारे गजानन मरकड पत्रकार बंधू या मंडळींनी आगार प्रमुख विकास कळवणे व उपहार प्रमुख विकास चव्हाण यांना निवेदन दिले व आगारप्रमुख यांनी तात्काळ नियोजनाची दखल घेऊन महंत व पत्रकार मंडळी यांनी केलेली मागणी लगेच मान्य केले त्यामुळे भक्त परिवारातून आगार साहेबांचे अभिनंदन होत आहे.

# एमजीएम 'ग्लिट्झ 2k25' वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.११ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय. पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाचा 'ग्लिट्झ २ज्ञ२५' वार्षिक स्नेह संमेलनाचा समारोप समारंभ रुक्मिणी सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख, स्नेह संमेलन समन्वयिका डॉ.सारिका शेळके, प्रा.डॉ.संजय आझादे, प्रा.डॉ. सतीश संकाये, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. विलास सपकाळ म्हणाले, विद्यार्थ्यांच्या कलगुणांना वाव देण्याच्या उद्देशाने स्नेहसंमेलन आयोजित करण्यात येते. या माध्यमातून आपले व्यक्तिमत्व विकसित होण्यास मदत होते. एमजीएम विद्यापीठ कायम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहिलेले आहे. आपल्याला स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर गुणवत्तापूर्ण शिक्षण महत्वाचे आहे. जे तृतीय वर्षातील विद्यार्थी आता विद्यापीठातून उत्तीर्ण होऊन जाणार आहेत, त्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा!

यावेळी विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, समहून नृत्य,पारंपरिक महाराष्ट्र नृत्य, नाटक आदि कलांचे सादरीकरण केले. यावेळी विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

समारोप समारंभाच्या प्रसंगी अभिनेता विक्की कौशल हा आपल्या आगामी 'छावा' या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी एमजीएम विद्यापीठात आला असता डॉ.जी.वाय.पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ढोल पथकाने त्याचे स्वागत केले. यावेळी त्याने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानवी दर्डा, सिद्धी तांदळे, सिद्धी काटे या विद्यार्थ्यांनी केले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (३७) **प्रार्थना (२)**

**आशय :- (२) आपण सर्व हिंदू, परमेश्वराचे अस्तित्व मानतो. तोच चराचर सृष्टीचे संचालन करतो. तो सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान परमेश्वर आहे. ज्ञानेश्वर माऊलींनी आता विश्वात्मके देवे असे म्हणून परमेश्वराला साद घातली. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी सर्व देशभक्तांना ही श्रीं ची इच्छा आहे, असे म्हणून साद घातली. रा.स्व. संघानी आम्ही हिंदू राष्ट्राचे अंगभूत नागरिक या नात्यांनी, राष्ट्र सर्वप्रथम या नात्यानी भारत मातेलाच परमेश्वर म्हणून साद घातली. तिला शक्ती, बुद्धी, शुद्ध चारित्र्य यासाठी शुभाशीर्वाद मागितले. व असे शुभाशीर्वाद देणाऱ्या परमेश्वर स्वरूप भारत मातेची पूजा कशी करायची हे ज्याचे त्याने ठरवावे. सबका साथ-सबका विश्वास- सबका विकास- सबका प्रयास या सोबत सबका कर्तव्य पण आवश्यक आहे. ड्शर्लीश्र्री मनोवृत्तीचे लोक म्हणतात- विविध धर्मीयांचा आपला देश आहे-ते हिंदू राष्ट्र नाही. परंतु हिंदू ही या देशाची म्हणजे हिंदुस्थानची ओळख आहे. भारताची ओळख इथली राज्यव्यवस्था राज्यप्रणाली किंवा राज्यशक्ती नाही तर भारताची ओळख तिची सांस्कृतिक विरासत आहे. भारत निर्माणात ऋषी-मुनी, संत-महंत, आचार्य धर्माचार्य, दार्शनीक, ज्ञानी- विज्ञानी, शिक्षक, सेवाव्रती यांचा हात आहे व ही पवित्र अनुभूती सर्वांनाच होत असते. आज विश्वाच्या नेतृत्वासाठी, श्रेष्ठ मॅनेजमेंट साठी आय आय एम, हॉवर्ड, स्टॅनफोर्ड, सारख्या जगप्रसिद्ध हजारो संस्था आहेत. पण तिथे त्याग; तपस्या; निष्ठा आणि प्रतिबद्धता शिकवत नाही. हे गूण संघाच्या शाखेत शिकवतात. व भारत मातेला सुजलाम सुफलाम करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.**

**।। भारत माता की जय।** **क्रमशः**

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# वनहक्क कर्मचारी करणार बेमुदत कामबंद आंदोलन; उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन



कन्नड, दि.११ फेब्रुवारी - तालुक्यातील वनहक्क कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्न व मागण्या मान्य करण्याकरीता १८ फेब्रुवारी २०२५ पासून कामबंद आंदोलन करण्याचा निर्णय राज्य स्तरीय वनहक्क कर्मचारी संघटनेच्या वतीने घेतला आहे. त्याबाबत उपविभागिय अधिकारी संतोष गोरड यांना दि.११ रोजी निवेदन दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की,वन हक्काच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वनहक्क कर्मचारी १० ते १५ वर्षापासून कार्यरत आहे. महागाईचा उच्चांक वाढल्यामुळे विविध शासकीय विभागाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन, मानधन, महागाई भत्ता, प्रवास भत्ता इत्यादी भत्यात शासनाकडुन वाढ करण्यात आली, सेवा व सुविधा शासनाने मान्य करून त्यांना सेवेची हमी बाबत संरक्षण दिलेले आहे. परंतू गेल्या पाच ते सहा वर्षापासुन वनहक्क कर्मचाऱ्यांच्या मानधनात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही तसेच कर्मचारी म्हणून कोणत्याही सुविधा लागू नाही.वनहक्क कर्मचारी जबाबदारीने काम करत असतात पण त्यांच्या निधीबाबत कोणतीही स्वतंत्र्य वेगळी तरतुद नाही,तर कंत्राटी १० प्रणाली मधुन मानधन करण्याची सुविधा उपलब्ध नाही, त्यामुळे दरवर्षी मार्च नंतर चार ते सहा महिने विना मानधन काम करावे लागते त्यामुळे कौटुंबिक समतोल साधण्यास मोठी कसतर करावी लागते. राज्यातील सर्व वनहक्क कर्मचा-यांना शासन सेवेत सामावून घेण्यात यावे, सर्व वनहक्क कर्मचाऱ्यांच्या पदाचा आकृती बंद तयार करण्यात यावा, महिला वनहक्क कर्मचाऱ्यांना सहा महिने वेतनासह प्रसुती रजा मंजूर करण्यात यावी आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. या निवेदनावर वनहक्क कर्मचारी संघटनेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रमुख अभिजित पानट, अध्यक्ष अनुप जामोदकर, उपाध्यक्ष किशोर टेंभरे, सचिव हर्षल सोनार, खजिनदार सचिन भोर आदींच्या सह्या आहेत.

## तालुक्यात बारावीच्या सर्व केंद्रावर परीक्षा सुरळीत पार

कन्नड :- दि.११ फेब्रुवारी- तालुक्यात दि.११ मंगळावर पासून इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेस सुरुवात झाली असून इंग्रजी विषयाच्या पेपरसाठी कन्नड तालुक्यातील १९ केंद्रावर ५ हजार ९९१ पैकी ५ हजार ८६४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर १२७ विद्यार्थी गैरहजर होते. सर्वच केंद्रावर परीक्षा सुरळीत सुरू असल्याची माहिती गट शिक्षणाधिकारी तथा परीरक्षक नीता श्रीश्रीमाळ यांनी दिली. प्रशासनाकडून कॉपीमुक्त व भयमुक्त परीक्षेसाठी तीन भरारी पथके, २० बैठक पथक, व ८१ पोलिस कर्मचारी तैनात असल्याची माहिती दिली आहे,सर्वच केंद्रावर चोख पोलीस बंदोबस्त असून,परिक्षा सुरळीत पार पडली आहे.

# अनमोल इंडस्ट्रीजची उत्पादने आता महाराष्ट्रातही उपलब्ध

### बिस्किटे, कुकीज, रस्क, चॉकलेट वेफर्स आणि केकने मिळवली लोकप्रियता



छत्रपती संभाजीनगर, ११ फेब्रुवारी २०२५ : आघाडीची पॅकेज्ड फूड कंपनी असलेल्या अनमोल इंडस्ट्रीज लिमिटेडने (अनमोल) आपल्या उत्पादनांची श्रेणी महाराष्ट्रात सादर केली आहे. यातून पश्चिम भारतात विस्ताराच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. प्रमुख क्षेत्रांमध्ये आपली उपस्थिती मजबूत करण्याची आणि देशभरातील ग्राहकांपर्यंत आपली खास चव पोहोचवण्याची कंपनीची कटिबद्धता या धोरणात्मक पावलातून अधोरेखित झाली आहे. सळसळती संस्कृती आणि वैविध्यपूर्ण लोकजीवन असलेला महाराष्ट्र हा अनमोलच्या उच्च-गुणवत्तेच्या उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीसाठी सुयोग्य बाजारपेठ ठरणार आहे.

उद्घाटनाचा कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात संपन्न झाला त्यावेळी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बिमलकुमार चौधरी; मार्केटिंग विभागाचे कार्यकारी संचालक अमन चौधरी, विक्री विभागाचे अध्यक्ष राम सिन्हा आणि प्रादेशिक विक्री व्यवस्थापक साहिल राज यांच्यासह प्रमुख चॅनेल भागीदार ही मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

नि. दि. दावा क्र. २४/२०२५

वादी : १) सुमनबाई जगन्नाथ शिंपी, वयः ७६ वर्षे, धंदाः शेती, रा. गोंदेगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद

// विरुध्द //

प्रतीवादी-१) गजानन जगन्नाथ शिंपी वय ५२ वर्ष, घदाः माहीत नाही (बेपत्ता), रहीवाशी गोंदेगाव ता सोयगाव जि. औरंगाबाद

दावा- प्रतीवादी मयत जाहीर होवुन वादी हे प्रतीवादीचे वारस असल्याचे जाहीर होवुन मिळणे बाबत

१/- असे की, प्रतीवादी हा वादी नं. ०१ चा मुलगा आहे. प्रतीवादी हा १५ वर्षाचा असतांना, प्रतीवादी थे वडील नामे जगन्नाथ गोबरु शिंपी यांनी प्रतीवादीला अभ्यासावरुन बोलले होते म्हणून प्रतीवादी हा दिनांक १५/०२/१९८७ ला घराबाहेर निघुन गेलेला आहे. वादीने आणि वादीच्या इतर नातलगांनी प्रतीवादीच्या खुप शोध घेतला परंतु प्रतीवादी हा आज पर्यंत मिळून आलेला नाही प्रतीवादी हे मिळुन न आल्यामुळे प्रतीवादी मयत झाल्याची शक्यता आहे प्रतीवादी हा बेपत्ता होवुन ३७ वर्षे ११ महीने झालेली असुन प्रतीवादीचा आज पर्यंत शोध लागलेला नाही म्हणुन ग्रा पं. कार्यालय गोंदेगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांचे दिनांकः २५/०१/२०२५ चे प्रतीवादी नामे 'गजानन जगन्नाथ शिंपी हा गोंदेगांव येथील रहीवासी होता परंतु गेल्या २० ते २२ वर्षापासुन गोंदेगांव येथे राहत नसुन प्रतीवादी हे मयत आहे की जिवंत आहे. यांसंबंधी ग्रा. पं. कार्यालय गोंदेगांव ता सोयगाव जि. औरंगाबाद ला काही एक माहीत नाही असा दाखला वादीने में न्यायालयाच्या सेवेत सादर केलेला आहे.

२/- असे की, वादी व प्रतीवादी यांची मौजे निभोरा ता सोयगांव जि औरगाबाद शिवेतील गट नं. १९१ क्षेत्रफळ ०१ है ३२ आर ही शेत जमीन प्रतीवादी यांच्या नावे आहे प्रतीवादी हा बेपत्ता झाल्यापासुन वरील वर्णनाची शेत जमीन ही वादी हे वैयक्तीकपणे मशागत घेवुन उपभोग घेत आहे. गट नं. १९१ क्षेत्रफळ ०१ है. ३२ आर प्रतीवादीच्या नावे असल्यामुळे त्या शेत जमीनी वरील शासकीय लाभ घेण्यासाठी वादी ही दिनांकः २४/०१/२०२५ ला संबंधी तलाठी सजा निंभोरा ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्याकडे गेले असता संबंधीत तलाठी यानी न्यायालयाच्या आदेशाची मागणी केली.

म्हणुन वादी यांनी मा. न्यायालय साहेब, सोयगांव यांच्याकडे ॲड. आर. एस. महाजन साहेब यांच्या मार्फत प्रतीवादी मयत जाहीर होवुन वादी हेच प्रतीवादीचे वारस असल्याचे जाहीर होवुन मिळणे बाबत दावा दाखल केला आहे. (पुढील दिनांकः- ०७/०४/२०२५).

प्रतीवादी हा दिनांकः- १५/०२/१९८७ पासुन बेपत्ता आहे. तरी कोणालाही प्रतीवादीचा कुठलाही पत्ता आढळून आल्यास सदर जाहीर प्रकटन पासुण ३० दिवसाच्या आत स्वःता किंवा लेखी स्वरुवात आपला आक्षेप मा. दिवाणी न्यायालय क. स्तर. सोयगांव येथे नोंदवावा अन्यथा कोणाताही आक्षेप नाही असे समजुन योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतानी नोंद घ्यावी.

आज दिनांकः ११/०२/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर**

ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

कि.दि.अर्ज क्र.९६/२०२५ — पुढील तारीख १२/०३/२०२५

अर्जदार : १) ज्ञानेश्वर लक्ष्मण गोटे, वय ४२ वर्ष, धंदा शेती, रा. गळनिंव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) राधाकृष्ण लक्ष्मण गोटे, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. गळनिंब ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) मंदा भ्र. किरण गवळी, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. नारायणगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्याचे विधिज्ञ ॲड. श्री. एम की. कसाने यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असून अर्जदार क्र.३ ही त्यांची वहिण आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई नामें आशाबाई लक्ष्मण गोटे या मोज गळनिव ता. गंगापुर येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक १९/०७/२०२४ रोजी मौजे गळनिव ता. गगापुर जि छत्रपती संभाजीनगर मयत झालेल्या आहे. तसेच अर्जदाराचे वडील नामे लक्ष्मण दशरथ गोटे हे सालसन २००५ मध्ये मयत झालेले आहे. मयत आशावाई लक्ष्मण गोटे यांना अर्जदार क्र.१ व २ हे मुले व अर्जदार क्र.३गी मुलगी असे कायदेशीर वारसदार असून अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात बारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १०/०२/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज क १०५/२०२५

अर्जदार : १) मिराबाई अशोक बर्डे, वय ५३ वर्षे, धंदा. मजुरी २) सुरेश अशोक बर्डे, वय. ४० वर्षे, धंदा. मजुरी, ३) राम अशोक बर्डे, वय. २९ वर्षे, धंदा. मजुरी, सर्व रा. लिंबेजळगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, अशोक विनायक बर्डे हे लिंबेजळगांव ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. २६/१०/२०२० रोजी लिंबेजळगांव ता. गंगापुर येथे मयत झाले असून त्यांचे आई साखराबाई व वडील विनायक हे देखील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले आहे. मयत अशोक विनायक बर्डे यांना त्यांची पत्नी अर्जदार क. १, आणी दोन मुले अर्जदार क. २ व ३ हे असे कायदेशीर वारस असून मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत अशोक विनायक बर्डे यांना अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत अशोक विनायक बर्डे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायलयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

दि.७/२/२५

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. विदयामान दिवाणी न्यायाधिश (क स्तर) न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

दि.कि.अर्ज नं. १०९/२०२५.

अर्जदार :- १) दगडाबाई जगन्नाथ वाघले वय ७१ वर्षे धंदा घरकाम २) सोनाली रामेश्वर वाघले वय ३१ वर्षे, धंदा-घरकाम ३) प्रज्वल रामेश्वर वाघले वय ११ वर्षे धंदा शिक्षण ४) श्रुती रामेश्वर वाघले वय ०७ वर्षे धंदा शिक्षण अर्जदार नं. ३ व ४ यांना अ.पा. क. जनक माता अर्जदार नं. २सोनाली रामेश्वर वाघले सर्व रा. अंबेगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज श्री.ए.एस. करडे गंगापुर विधीज्ञ यांच्यामार्फत अर्ज सादर केला असुन अर्जदार हे वरील ठिकाणाचे कायमचे रहीवाशी असुन असुन अर्जदार नं. १ यांचा मुलगा, अर्जदार नं. २ यांचे पती व अर्जदार नं. ३ व ४ यांचे वडील नामे रामेश्वर जगन्नाथ वाघले हे दिनांक २२/१२/२०२४ रोजी मौजे ओरिइयोन, सिटी केअर, स्पेशिऍलिटी रुग्णालय उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले आहे. मयत रामेश्वर जगन्नाथ वाघले यांना अर्जदार हे कायदेशिर एकमेव वारसदार आहे अर्जदार यांना मयत रामेश्वर जगन्नाथ वाघले यांच्या वारसकार्यवाही कामी मयत रामेश्वर जगन्नाथ वाघले यांचे वारसप्रमाणपत्र हे कार्यालयीन व शासकीय कामासाठी आवश्यकता आहे. सदरील वारसप्रमाणपत्र देण्यास अर्जदारांच्या नावाने देण्यात यावे.

त्याअर्थी याबाबत आपला काही आक्षेप अथवा उजर असल्यास तीस दिवसाच्या आत स्वःता अथवा त्यांच्या विधीज्ञामार्फत या न्यायालयात सादर करावा नसता मुद्दतीनंतर वरील अर्जदाराच्या अर्जावर आपला कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही केली जाईल. करिता आज दिनांक /०२/२०२५ रोजी सही व शिक्कानिशी देत आहे

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक साहय्यक अधिक्षक

मा. दिवाणी क. स्तर न्यायालय

गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

## जाहीर प्रगटन

**वैजापूर येथील श्री एल. जी पाच्छे, तदर्थ जिल्हा न्यायाधिश-२, वैजापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज ०९/२०१६

अर्जदार : अर्चना कृष्णा शेळके

प्रति, गैरअर्जदार

विरुध्द

२ (अ). सुर्यकला भ्र सुधाकर साळुंके वय ४० वर्षे पत्ता- गल्ली नं. ४ स्मशान मारुती रोड, कैलासनगर औरंगाबाद. २ (ब) श्रीधर पिता रामदास शेळके वय ३२ वर्षे धामोरी बु. ता. गंगापुर जि. औरंगाबाद. २ (क) ज्ञानेश्वर पिता रामदास शेळके वय ३० वर्षे रा. धामोरी बु. ता. गंगापुर जि. औरंगाबाद.

ज्याअर्थी १. अर्चना कृष्णा शेळके वि. भगवान बंडु शेळके रा. धामोरी बु. ता. गंगापूर जि. औरंगाबाद. यांनी या न्यायालयात श्री डी बी भिंगारदे वकिल यांचे मार्फत दिवाणी किरकोळ अर्ज ०९/२०१६ अर्चना वि. भगवान दाखल केले आहे.

आपणास यापुर्वीही सद्य प्रकरणांत नोटीस मा. कोर्टाने पाठविली असता तिची बजावणी तुम्हास न होता विना तामील वापस आली आहे.

त्याअर्थी याद्वारे तुम्हास कळविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्याकरीता सदर जाहीर नोटीस वर्तमान पत्रात प्रकाशीत झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांचा आत या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकिलामार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निर्धारित वेळेत किंवा तत्पुर्वी बजावणी करीता पत्ता देण्यास कसुर केल्यास तुमचा बचाव ग्राह्य धरला जाणार नाही.

आज दिनांक ११/०२/२०२५ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी देण्यात आले.

आदेशान्वये

लिपिक — सहा. अधिक्षक

जिल्हा व सत्र न्यायालय, वैजापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद,**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. : १९३/२०२४

अर्जदार : १. शंकर सुपडू परदेशी, वय-६५ वर्षे, धंदा -शेती, रा. नांदगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर, २. समाधान शंकर परदेशी, वय-२५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. विद्या गणेश परदेशी, वय-४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. वाकडी, ता. जामनेर, जि. जळगांव. ४. लिना प्रविण डोभाळ, वय-३७ वर्षे, धंदा घरकाम रा. दोंडवाडा, ता. जामनेर, जि. जळगांव.

विरूध्द

गैरअर्जदारः कुणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. पी.एम. चौधरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत सुमन शंकर परदेशी ह्या दि. २६/०८/२०२० रोजी नांदगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत सुमन शंकर परदेशी यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०७/०३/२०२५.

आज दि. ०७/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र.८८/२०२५

अर्जदार : १) अलकाबाई भ्र देविदास दारुंटे वय ५७ वर्षे धंदा शेती रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) प्रदिप देविदास दारुंटे, वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) प्राजक्ता भ्र. वाल्मिक म्हैस, वय ३२ वर्षे, धंदा शेती रा. मातुलठाण ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर ४) अर्चना भ्र. रविंद्र कुळधरण, वय ३० वर्षे, धंदा शेली, रा. धोत्रे ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर ५) मनिषा भ्र. विशाल माळवदे, वय २९ वर्षे, धंदा शेती रा. धोत्रे ता कोपरगाव जि. अहिल्यानगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.बी. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ५ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील नामे देविदास पुंजाराम दारुंटे मौजे मुद्देशवाडगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०६/०८/२०२४ रोजी मौजे मुद्देशवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत देविदास पुंजाराम दारुंटे यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याने मयताचे पश्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्वीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक ११/०३/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०६/०२/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क १०६/२०२५

पुढील ता. २१/३/२५

अर्जदार : १) चंद्रकला भ्र. अंकुश बर्डे, वय. ५८ वर्षे, धंदा. मजुरी २) रूख्मन भ्र. बबन निकम, वय. ३७ वर्षे, धंदा. मजुरी, ३) राजु अंकुश बर्डे, वय. ४० वर्षे, धंदा. मजुरी, सर्व रा. लिंबेजळगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, अंकुश विनायक बर्डे हे लिंबेजळगांव ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. १३/०३/२०२३ रोजी लिंबेजळगांव ता. गंगापुर येथे मयत झाले असून त्यांचे पुर्वी नामे साखराबाई हया देखील मयत झालेली आहे. मयत अंकुश बर्डे यांना त्यांची पत्नी अर्जदार क. १, विवाहती मुलगी अर्जदार क. २ व मुलगा अर्जदार क. ३ हे असे कायदेशीर वारस असून मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत अंकुश विनायक बर्डे यांना अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत अंकुश विनायक बर्डे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायलयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

दि. ७/०२/२५

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज क १०२/२०२५

अर्जदार : १) राहुल रामनाथ मोरे, वय. ३६ वर्षे, धंदा. शेती, २) अलका भ्र. रामनाथ मोरे, वय. ५३ वर्षे, धंदा. घरकाम, दोघे रा. पुरी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, रामनाथ मारूती मोरे हे पुरी ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. २१/०९/२०२२ रोजी पुरी ता. गंगापुर येथे मयत झाले असून यांना मुलगा अर्जदार क. १ आणि पत्नी अर्जदार क. २ असे कायदेशीर वारस असून मयताचा मुलगा लगा नामे योगेश रामनाथ मोरे हा दि. १९/०४/२०२० रोजी म्हणजे रामनाथ यांच्या आगोदर अविवाहीत मरण पावला आहे. मयतास अर्जदारांशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत रामनाथ मारूती मोरे यांना अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत रामनाथ मारूती मोरे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायलयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

दि.७/०२/२५

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

# गावठी कट्ट्यांची निर्मिती मराठवाड्यातच !

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ११ फेब्रुवारी**

उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश या ठिकाणाहून गावठी कट्टे, पिस्टल आयात होत असल्याचा संशय व्यक्त होत असला, चर्चा होत असली तरी गावठी कट्ट्यांची निर्मिती मराठवाड्यातच होत असल्याची माहिती सुत्रांनी दिली. त्यामुळे मराठवाड्यातच गावठी कट्ट्यांची निर्मिती होत असताना पोलीस अनभिज्ञ कसे ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नांदेड शहरात सरासरी आठवड्यात पोलीस गावठी कट्टा, पिस्टल जप्तीची कारवाई करतात. मागील एक ते दिड वर्षाच्या कालावधीत पोलीसांनी जवळपास २०० च्या आसपास गावठी कट्टे, पिस्टल जप्त केलेल्या आहेत. असे असतानाही गुन्हेगारांकडून गावठी कट्ट्यांचा वापर होत असून याचे ताजे उदहारण म्हणजे दि. ८ फेब्रुवारी रोजी शहरातील कै. वसंतराव नाईक पुतळ्या शेजारी पिस्टल हाताळता न आल्याने दोघे जण जखमी झाले होते. गावठी कट्टे पिस्टल त्यांना सहजपणे उपलब्ध होत आहे. तर दुसरीकडे पोलीस दल कारवाई केवळ गुन्हे दाखल करण्यापूरती मर्यादीत राहिले आहे. गावठी कट्टे, पिस्टल निर्मिती कुठे होते याचा शोध अद्यापपर्यंत पोलीसांना लागलेला नाही.



परंतू खात्रीलायक सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार गावठी कट्टे हे बिहार, मध्यप्रदेश या ठिकाणाहून आयात करण्यात येत नसून याची निर्मिती मराठवाड्यातच होत आहे. विशेष करून परभणी, जालना, नांदेड या ठिकाणी गावठी कट्टे तयार करण्यात येत आहेत. परराज्यातून गावठी कट्टे पिस्टल खरेदी करण्यासाठी जास्तीची रक्कम मोजावी लागत असल्याने गुन्हेगार आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने मराठवाड्यातील नांदेड, परभणी, जालना आदी ठिकाणाहून उपलब्ध करून देत आहेत. विशेष म्हणजे घरातच हे गावठी कट्टे तयार करण्यात येत असून गुन्हेगारांच्या साखळीच्या माध्यमातून सहज उपलब्ध होत आहेत. तर दुसरीकडे याच प्रमाणात पोलीसांनी गावठी कट्टी देखील जप्त केले आहेत. परंतू केवळ जप्तीची कारवाई नव्हे तर पोलिसांनी गावठी कट्टे तयार करणाऱ्यांचा शोध घ्यावा अशी मागणी होत आहे.

## मुलींना व महिलांना मोफत कायदेविषयक सल्ला देणार : ॲड. सुरेखा पवार

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. ११ फेब्रुवारी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित, देगलूर महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्यावतीने महिलांचे आरोग्य व स्त्री हक्क कायदे याविषयी जनजागृतीपर कार्यशाळा संपन्न झाली.

कार्यशाळेत डॉ. गीता रेखावार यांनी 'बदलती जीवनशैली व स्त्री आरोग्य' या विषयावर, ॲड. सुरेखा पवार यांनी 'स्त्री हक्क संरक्षणविषयीचे विविध कायदे' व ॲड. पल्लवी डावखरे (कळसकर) यांनी स्त्री शोषणविरोधी कायदे या विषयावरील व्याख्याने संपन्न झाली. या कार्यशाळेत आरोग्यविषयक व कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मोहन खताळ होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , डॉ. विनय भोगले , डॉ. गीता रेखावार, ॲड. सुरेखा पवार व ॲड. पल्लवी डावखरे (कळसकर) व संयोजक प्रा डॉ. किशन सुनेवार हे मंचावर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ मोहन खताळ यांनी महिलांच्या आरोग्य, स्त्री हक्क संरक्षणविषयीचे विविध कायदे आणि - स्त्री शोषणविरोधी कायदे याअनुषंगाने विद्यार्थिनीमध्ये मुक्त चर्चा व्हावी, अनेक शंका दूर होणे गरजेचे आहे, यासाठी अशा कार्यक्रमातून चिंतन आणि चर्चा घडावी याबद्दल अपेक्षा व्यक्त केली.

## शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद, दि. ११ फेब्रुवारी**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड मार्फत स्टार्स व समग्र शिक्षा अभियान अंतर्गत प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे पाच दिवसीय शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.० उत्साहात आणि आनंदी वातावरणात प्रारंभ झाले. धर्माबाद तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी रविशंकर मरकंटे ,आबासाहेब उस्केलवार गट समन्वयक , ग्रीन फिल्ड नॅशनल स्कुलचे मुख्याध्यापक शेख सर यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणाचे उदघाटन करण्यात आले.

जिल्हा स्तरावर प्रशिक्षण घेतलेले सुलभक शिवकुमार पाटील, साईनाथ कामिनवार, नासा येवतीकर, नविनकुमार आरगुलवार, नागोराव कानगुलकर, नागोराव कमलाकर, रहीम शेख, सय्यद आणि रविकांत मडोळे मार्गदर्शन करत आहेत. गट समन्वयक आबासाहेब उस्केलवार हे याप्रशिक्षणाचे प्रमुख म्हणून काम पाहत आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### होली सिटी पब्लिक स्कुलची भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इसरो) येथे शैक्षणिक सहल

**नांदेड**-नांदेड येथील होली सिटी पब्लिक स्कुल पासदगावची इयत्ता ९ वीची शैक्षणिक सहल बेंगरूळू येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इसरो) येथे संपन्न झाली. दि.३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ६ वाजता बेंगरूळू एक्सप्रेसने विद्यार्थ्यांना सहलीला शुभेच्छा देऊन रवाना करण्यासाठी होली सिटी पब्लिक स्कुलचे संचालक मंडळ, मुख्याध्यापक मोहमद अर्शद, बाळासाहेब पवार, सुजाता नाईक मिस, वर्गशिक्षक रिना साले मिस, राजेश जामगे आणि पालक हे उपस्थित होते. सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी इस्कॉन मंदिर, कर्नाटक विधानसभा भवन, लालबाग बॉटनिकल गार्डन आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्थेस भेट दिली. तेथे विद्यार्थ्यांनी विविध माहिती घेऊन इंदिरा गांधी म्युजिकलं फाऊंटन पार्क, नम्मा फिश एक्वैरियम प्रदर्शन, बंगरुळू, विशवेश्वर्या इंडस्ट्रियल टेकनॉलॉजिकल म्युझियम बंगरुळू हे भारतातील पहिले एरोस्पेस म्यूझियम आहे. हे म्यूझियम, बेंगळूरू येथील हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या परिसरात आहे. या म्यूझियममध्ये भारतीय विमान क्षेत्राच्या वाढीचे आणि एचएलच्या विकासाचे दर्शन घेता येते. तसेच लालबाग बॉटनिकल गार्डन आणि वॉटर फॉल मध्ये जाऊन विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद लुटला आणि दक्षिण भारतीय जेवणाचा आस्वाद घेतला. सहल यशस्वी होण्यासाठी सहल प्रमुख बाळासाहेब पवार, सुजाता नाईक मिस, कर्मा कंधारे व अर्चना चिंचाळकर यांचे सहकार्य लाभले. सहलीत इयत्ता ९ वी तील ३६ मुले आणि मुली होत्या. अशाप्रकारे सहल खूप आनंददायी वातावरणात संपन्न झाली.

### बौद्ध महासभेच्या अध्यक्षपदी वारघडे, सरचिटणीस महाबळे तर कोषाध्यक्षपदी कांबळे

**लोहा**-भारतीय बौद्ध महासभा नांदेड जिल्हा दक्षिणच्या अध्यक्षपदी हौसाजी वारघडे सरचिटणीस रत्नाकर महाबळे तर कोषाध्यक्ष म्हणून बी डी कांबळे यांची निवड करण्यात आली. श्रद्धा स्थळ भीमघाट नालंदा बुद्ध विहार नांदेड या ठिकाणी नवीन कार्यकारिणी निवडीसाठी भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष एस के भंडारे, राष्ट्रीय सचिव बी एच गायकवाड, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष यू जी बोराडे, राज्य संघटक डॉ. यशवंत चावरे ,माजी राष्ट्रीय संघटक प्रभाकर नांदेडकर, नांदेड जिल्ह्याच्या महिला अध्यक्षा रेखा पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकारणीची नीवड करण्यात आली अध्यक्ष हौसाज वारघडे, सरचिटणीस रत्नाकर महाबळे, कोषाध्यक्ष बी डी कांबळे, संस्कार उपाध्यक्ष पांडुरंग वाघमारे, पर्यटन उपाध्यक्ष शंकर भंडारे, हिशोब तपासणीस संभाजी पैठणे, कार्यालयीन सचिव हरी कसबे ,संस्कार सचिव चंद्रकांत चौदंते, मारुती गोडबोले ,पर्यटन सचिव अक्षय गजभारे भीमराव पवार ,संरक्षण सचिव आनंदा गोडबोले ,संघटक सुभाष खाडे ,मिलिंद कांबळे, विलास कांबळे ,सुनील गोदने बालाजी नरहीरे, सर्व नूतन कार्यकारणीसाठी मुंबईवरून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या .

### ऑलिंपियाड परिक्षेत तेजसी बाचेला गोल्डमेडल

**नांदेड**-सायन्स ऑलिंपियाड फाऊंडेशन अंतर राष्ट्रीय गणित ऑलिंपियाड परिक्षेचा नुकताच निकाल जाहीर करण्यात आला असून यात नांदेड शहरातील लिटल्स स्कॉलर्स पब्लिक स्कुलची विद्यार्थीनी कु. तेजसी बाचे या विद्यार्थीनीला गोल्ड मेडल प्राप्त झाले आहे. अंतरराष्ट्रीय दर्जाच्या असणाऱ्या गणित ऑलिंपियाड परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परिक्षेत नांदेड शहरातील अनेक विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली होती. यात लिटल्स स्कलॉलर्स पब्लिक स्कुल या शाळेतूनही अनेक विद्यार्थ्यांनी ही परिक्षा दिली होती. मात्र यात इयत्ता पहिल्या वर्गातील तेजसी बाचे यांनी पहिल्याच प्रयत्नात गोल्ड मेडल मिळवल आहे. त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे संचालक रविंद्र रेड्डी, मुख्याध्यापिका उज्वला राणे, शिक्षिका संगिता मदनुरकर, स्नेहलता मेटकर, शिल्पा पिटलमकर, कल्पना चव्हाण, अश्विनी कुलकर्णी, मिरा काळबांडे, सविता कदम यासह अनेकांनी तिच्या या यशाबद्दल पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## नंदिग्राम गृहनिर्माण सहकारी संस्थेचे चेअरमन अपात्र

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ११ फेब्रुवारी**

शहरातील नंदिग्राम सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन राजेश सोनकांबळे यांनी निवडणूक झाल्यानंतर विहित कालावधीमध्ये निवडणुकीच्या खर्च दाखल न केल्याने नियम २०१४ चे नियम ६६ अन्वये सहकारी संस्था निंबधक यांनी तीन वर्षाकरिता त्यांना अपात्र केले आहे.

नंदिग्राम सहकारी संस्था नांदेड ही संस्था महाराष्ट्र सरकारी सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी झालेली सहकारी संस्था आहे. त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था समिती निवडणूक नियम २०१४ मधील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक आहे. परंतु संस्थेचे चेअरमन राजेश सोनकांबळे यांनी निवडणूक खर्च सादर न केल्याने त्यांच्यावर तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी अशी मागणी सरदार तेजवान सिंह पुंड यांनी केली होती. त्या अनुषंगाने दिनांक २४ जानेवारी रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सुनावणीस पुराव्यासह सादर उपस्थित राहून सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होता राजेश सोनकांबळे यांना सदर नोटीस तालीम करण्यासाठी कार्यालयातील कर्मचारी दिनांक १७ जानेवारी रोजी संस्थेच्या शारदानगर येथील कार्यालयास गेले असता सदरील कार्यालय बंद होते. त्या नंतर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन नोटीस देण्याच्या प्रयत्न केला परंतु कुटुंबातील सदस्यांनी नोटीस घेण्यास नकार दिला शिवाय संस्थेचे अध्यक्ष राजेश सोनकांबळे यांनीही काम काजाचे पत्र घेण्यास नकार दिला होता. निवडणुकीच्या निकाल जाहीर झाल्यानंतर ६० दिवसाच्या आत निवडणूक निर्णय अधिकारी किशोर सादर करणे बंधनकारक आहे परंतु सोनकांबळे यांना ठरवून दिलेल्या कालावधीत निवडणूक खर्च सादर केला नसल्याने आढळून आले.

## बुरुड समाजाच्या वतिने आ. राजेश पवार यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. ११ फेब्रुवारी**

उमरी तालुका बुरुड समाज संघटनेचा वतीने व उमरी येथील सामाजिक कार्यकर्ते अमित पटकुटवार यांनी बुरूड समाजाला स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ देण्यात यावे अशी मागणी आ राजेश पवाराकडे निवेदनाद्वारे केली आहे. बुरुड समाज हा अनुसूचित जातीत समाविष्ट आहे. हा समाज महाराष्ट्रभर सर्वत्र विखुरलेला आहे. बांबूवर उदरनिर्वाह करणारा हा समाज विकास व प्रगतीपासून कोशो दूर आहे बुरुड समाजात अतिशय गरीब श्रमजीवी लोक असून, समाजाचे शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. पारंपारिक कुटीर उद्योगांना चालना देणारा हा समाज आहे. यापुढे बुरुड समाज विकासाच्या प्रमुख प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना व त्यासाठी आर्थिक साह्य मिळणे आवश्यक आहे त्यामुळे बुरुड समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाचे स्वंतत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे तसेच विधानसभेत हा प्रश्न तारांकीत करावा आशी विनंती केली आहे.

# सिडको परिसरातील सात परिक्षा केंद्रावरील ४७ विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयाकडे फिरवली पाठ

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ११ फेब्रुवारी**

बारावी बोर्डाच्या लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते ११मार्च २०२५ कालावधी साठी नवीन नांदेड येथिल सात परीक्षा केंद्रात ११ फेब्रुवारीपासून बारावीच्या परीक्षा सुरू झाल्या असून पहिल्या दिवशी २२२५ पैकी २२०८ विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा पेपर दिला तर तब्बल ४७ विद्यार्थ्यांनी फिरवली पाठ.

नवीन नांदेड सिडको परिसरातील वाघाळा येथील महात्मा फुले उच्च माध्यमिक आश्रम शाळेत ४२८ पैकी ४१८ विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा पेपर दिला. तर १० विद्यार्थ्यांनी इंग्रजीला दांडी मारली आहे. या परीक्षा केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून साहेबराव लोनावळे हे काम पाहत असून त्यांना मुख्याध्यापक भगवान इंगेवाड परीक्षा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. दरम्यान सिडको परिसरातील शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयात २८२ पैकी २७१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर ११ विद्यार्थ्यांनी दांडी मारली आहे. या केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून नागनाथ दिंडे काम पाहत असून परीक्षा सुरळीत चालू ठेवण्यासाठी कैलास माने हे त्यांना सहकार्य करत आहेत. दरम्यान इंदिरा गांधी महाविद्यालयात परीक्षेच्या पहिल्या दिवशी ३७३ पैकी ३६७ विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा पेपर दिला. तर ६ विद्यार्थ्यांनी परीक्षेकडे पाट फिरवली. येतील केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून संजय देशमुख हे काम पाहत असून एन.बी.दारमोड हे त्यांना सहकार्य करीत आहेत. कुसुमताई उच्च माध्यमिक विद्यालयात बारावीच्या २०० पैकी १९५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ५३ परीक्षार्थी परीक्षेला गैरहजर होते. येथील केंद्रप्रमुख म्हणून अंगत केंद्रे काम पाहत आहेत. वसरणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात २४८ पैकी २४६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर २ विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयाच्या पेपर कडे पाठ फिरवली आहे. येथे केंद्रप्रमुख म्हणून साहेबराव देवरे काम पाहत असून. प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार हे परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी परिश्रम घेत आहेत. दरम्यान काकांडी येथील शिवशक्ती उच्च माध्यमिक विद्यालयात ३४४ पैकी ३३८ विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयाचा पेपर दिला तर ६ विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयाच्या पेपर कडे पाठ फिरवली आहे येथे केंद्रप्रमुख म्हणून प्रकाश पवार काम पाहत असून राजेंद्र वानोळे हे त्यांना सहकार्य करीत आहेत राष्ट्रमाता उच्च माध्यमिक विद्यालयात बारावीच्या ३८० पैकी ३७३

विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या पहिल्या दिवशी इंग्रजीचा पेपर दिला तर ७ विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयाकडे पाठ फिरवली आहे येथील केंद्रप्रमुख म्हणून मुख्याध्यापक तुकाराम गाडेकर हे काम पाहत आहेत. दरम्यान नवीन नांदेड परिसरातील वरिल परीक्षा केंद्रात पोलीस बंदोबस्त व बैठे पथक तसेच भरारी पथकातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी भेटी देऊन कॉपीमुक्त परीक्षा करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

## नायगाव मतदार संघाला विकासनिधी कमी पडू देणार नाही : आ. राजेश पवार

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. ११ फेब्रुवारी**

नायगाव मतदार संघात विकास कामाची निधी कमी पडू देणार नाही पण माझ्या सोबत असणाऱ्या कार्यकर्ते यांना जिल्हा परिषद , पंचायत समिती इतर सहकारी संस्थानाही पुढाकार घेवून मदत करणार असल्याचे आश्वासन आमदार राजेश पवार यांनी दिले. उमरी येथिल जाहीर नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.



नायगाव मतदार संघातील उमरी, धर्माबाद, नायगाव तालुक्यात विकास करून जनसामान्य मतदारांचे मन जिंकून विकासाचा समान रित्या धुमधडका केला आहे. त्यामुळे उमरी तालुक्यात आमदार राजेश पवार यांचा सर्व धर्मीय व्यक्तीने प्रत्येक चौका-चौकात सामाजीक समस्याचे निवेदन देवून आमदार राजेश पवार व त्यांच्या सुविद्य पत्नी पुनमताई पवार यांचे भव्य स्वागात करण्यात आले .

उमरी शहरात नगर परिषदच्या वतिने तर व्यापारी , बौद्ध , मांतग , बुरूड समाज , मराठा समाज मुस्लीम समाज , शिख समाज , सोनेचांदी शराफा , कापड दुकान , व्यापारी ओसीयन पत्रकार संघ , सरपंच संघटना पोलिस पाटील , चेअरमन , महसुल संघटना शिवसेना शिंदे गट , राष्ट्रवादी अजित पवार गट , बंजारा समाज तर पारंपारीक वेशभुषात आदिवासी नृत्यु सादर करू आमदार राजेश पवार यांचे जंगी भव्य स्वागत केले आहे . या कार्यक्रमास विविध समाज संघटनेचे , राजीकीय व शासकीय कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित असल्याने आमदार राजेश पवार यांचा नागरी सत्कार ना भुतो ना भविष्य झाला. आज पर्यंत या भागातून अनेक आमदार , खासदार निवडून येवून मंत्री ही झाले पण उमरी तालुक्यातील नागरीकांनी कोणत्याही आमदार खासदार मंत्री यांचे एवढे भव्य स्वातगत केले नाही. उमरी शहरातील भव्य नागरी सत्कार म्हणजे आमदार राजेश पवार यांनी माझ्या कारकर्दीद विस्मरणीय आहे असे उदगार करीत भव्य अशा सत्कार सोहळ्यात भारावून गेले असून माझा विजय हा मतदाराचा विजय आहे मी आमदार असलो तरी सामान्य नागरीक म्हणून मला हक्काने प्रश्न मांडावे मी ते काम करून दाखवेलच गतवर्षाची विकास कामे पाहून पुन्हा एकदा आमदार म्हणून माझी निवड केलात त्या विश्वासाला पात्र राहून कार्यकर्ते व जनतेची सेवा करण्यास कटीबद्ध राहील असे आमदार राजेश पवार यांनी नागरी सत्कार सोहळ्यात जाहीर बोलून मतदाराचे आणि उमरी नागरी सत्कार सोहळा समितचे आभार मानले आहे.

## लोहा तालुक्यात बारावी परिक्षा सुरळीत

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. ११ फेब्रुवारी**



तालुक्यात बारावी परिक्षा सुरळीत चालू आसुन चार परीक्षा केंद्रावर बारावीच्या परीक्षा सुरळीत सुरू झाल्या आहेत.संत गाडगे महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे एकूण परीक्षार्थी ७६३ पैकी७५७, नारायणना इंटरनॅशनल स्कूल ,४६५पैकी ४५४ ,शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय सोनखेड ३५० पैकी ३४७, संत गाडगेबाबा उच्च माध्यमिक विद्यालय सोनखेड ३०१पैकी २९६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली एकुण १८७९पैकी१८५४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षा केंद्राला अरुणा संगेवार उपविभागीय अधिकारी , विठ्ठल परळीकर तहसीलदार, सतिश व्यवहारे गटशिक्षणाधिकारी,लोहा सोनखेड पोलीस निरीक्षक यांनी भेटी दिल्या. चार परीक्षा केंद्रावर बैठे पथक नेमण्यात आले होते.यात शिक्षण विस्तार अधिकारी/ केंद्रप्रमुख, तलाठी, ग्रामसेवक यांच्या नियुक्ती करण्यात आल्या होत्या.

## दारुच्या नशेत अन्ननलीकेत अडकले अन्न; जिव वाचवण्याच्या प्रयत्नात गेला जिव

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी, दि. ११ फेब्रुवारी**

अन्न नलिकेत अन्न अडकल्याने जीव वाचविण्याच्या प्रयत्नात पायऱ्यांवरून पडल्याने कुंडलवाडी येथिल लक्ष्मण यलप्पा पिलाला यांचा मृत्यू झाल्याची घटना दि. ०९ फेब्रुवारी रोजी घडली. या प्रकरणी कुंडलवाडी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असल्याची माहिती कुंडलवाडी पो.नि.ज्ञानेश्वर शिंदे यांनी दिली. पुढील तपास पो.हे.कॉ. अब्दुल गफुर शेख करीत आहेत.


# हदगांव नगर परिषद हदगांव

ता. हदगाव जि. नांदेड
०२४६८ ऑफिस २२२४०८
Email-id-cohadgaongmail.com — स्थापना १९५४

ह.न.प.जा.क्र./बा.वि./ ४६८ /२०२५ — दिनांक १०/०२/२०२५

**ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना**
**(स्वच्छ भारत मिशन (शहरी-२) योजना)**

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव खालील विकास कामाची निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अहर्तापत्र तांत्रिक बी-१ नमुन्यात हि द्वी लिफाफा पद्धतीने स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अनु क्र. | कामाचे नाम | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामाची कालावधी | ई-निविद फार्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | "Construction Commissioning of Windrow Shed, Machinery-Plastic Dust Remover Machine, Sanitary Landfill, Leachate tank nd other works as per BOQ for Municipal Solid Waste Management Work at Hadgaon Municipal Council under Swachh Bharat Mission (Urban 2.0).. " | ७२३३४१४ | ७२३३४ | करार करते वेळी १ % बिलातून ८ % | वर्ग ४ व त्यावरील | १८० दिवस | ५०००/- |

अटी व शर्तीसह सविस्तर ई-निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १२/०२/२०२५ ते २०/०२/२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दि. २०/०२/२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

**मुख्याधिकारी**
**न.प. हदगाव**


**प्रशासक**
**न.प. हदगाव**


# हदगावात शिक्षकच केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी

## प्राथमिक शिक्षणाचा बट्ट्याबोळ !

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. ११ फेब्रुवारी**

हदगाव तालुक्यातील गटशिक्षण अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हदगाव तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम चालू असतो त्यात गटशिक्षणाधिकारी यांनी ज्या शिक्षकाची नेमणूक प्राथमिक शिक्षक म्हणून जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत नेमणूक करण्यात आली आहे त्यातील काही निवडक शिक्षकांना प्राथमिक शिक्षकाचे काम न करता केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी या अशा अनेक पदावर नियुक्ती करून त्यांना ज्ञानदानाचे कार्य न करता तालुक्यालाच राहून कार्यभार करण्याचे अधिकार दिले असे म्हणावे लागेल.



नांदेड जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी सविता बिरगे यांनी दि.२९ जानेवारी रोजी हदगाव गटशिक्षणाधिकारी यांना एक शासन पत्रक पाठवण्यात आले व त्यात नमूद करण्यात आले हदगाव तालुक्यातील तुम्ही जे नेमणुका केल्यात जे घटनाबाह्य आहेत.

प्राथमिक शिक्षणाचे कार्य करणाऱ्या शिक्षकांना तुम्ही केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी हे जे नेमणुका केल्यात ते तात्काळ रद्द करून त्यांचा कार्यभार ज्यांच्याकडे शासन नियमाने केंद्रप्रमुख व शिक्षणाधिकारी या पदाचा कार्यभार दिलेला आहे त्यांच्याकडे तो कार्यभार सुपूर्द करून यांना कार्यमुक्त करून यांची ज्या पदावर मूळ नेमणूक आहे त्या पदावर कार्य करण्यात पाठवावे व तुम्ही घेतलेल्या निर्णय उलट तपासी नांदेड जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यालयास पाठवावा असा अध्यादेश काढून सुद्धा हदगाव येथील गटशिक्षणाधिकारी यांनी या निर्णयाला केराची टोपली दाखवून मीच हदगाव शिक्षण विभागाचा अधिकारी आहे. मी नांदेड जिल्ह्याचा आदेश मानत नाही असेच म्हणावे लागेल.

नांदेड जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी सविता बिरगे यांनी असे आदेशित केले की, तुम्ही जे घेतलेला निर्णय घटना बाह्य असून ज्या शिक्षकाची नेमणूक तुम्ही केंद्रप्रमुख शिक्षण अधिकारी केलेली आहे अशा कर्मचाऱ्यांचा तात्काळ पदभार काढून त्यांच्या मूळ ज्या ठिकाणी कार्यरत आहेत त्या ठिकाणी पाठवावे अन्यथा तुमच्यावर शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये असे आदेशित करून सुद्धा हदगाव शिक्षणाधिकारी यांनी या पत्राला केराची टोपली दाखवली आहे. मीच जिल्ह्याचा व तालुक्याचा शिक्षणाधिकारी आहे असे म्हणावे लागेल.









मंगळवारपासून इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेला सुरुवात झाली. परीक्षा शांततेत आणि कॉपी मुक्त वातावरणात पार पडावी यासाठी प्रशासनाने चोख नियोजन केले आहे. यासाठी परीक्षा केंद्र परिसरात १४४ जारी करण्यात आले. प्रत्येक केंद्रावर बैठे पथक, फिरते पथक नेमण्यात आले. पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)

# भाजपा परिवारात महाराष्ट्रातून १ कोटी सदस्यांची भर

## भाजपच्या प्राथमिक सदस्य अभियानाची बीड जिल्ह्यात गगन भरारी १ लाख साठ हजार -शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ फेब्रुवारी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डाजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेजी यांचे नेतृत्व भाजपा परिवारात महाराष्ट्रातून १ कोटी सदस्यांची भर झाली असुन लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांचे मार्गदर्शना खाली बीड जिल्ह्यात १ लाख साठ हजार भाजप सदस्य नोंदणी झाल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी दिली आहे



महाराष्ट्रात १ कोटी सदस्य नोंदणी पूर्ण झाली आहे बीड जिल्ह्यात लोकनेत्या पंकजाताई

भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्रात संघटन पर्व सुरु असून पंतप्रधान नरेंद्र मोदीजी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डाजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेजींचे नेतृत्वात भाजप सदस्य नोंदणी अभियान १ जानेवारी पासुन सुरु असुन आज मुंडे मा.खा.प्रितमताई मुंडे आ.सुरेश आण्णा धस आ.नमिता मुंदडा यांचे नेतृत्वाखाली हे अभियान सुरु आहे बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मिळुन दि ९ फेब्रुवारी पर्यंत एकूण १६००५७ भाजप सदस्य नोंदणी झाली आहे.गेवराई विधानसभा १३०२० माजलगाव विधानसभा १८६६७ बीड विधानसभा २२१५१ आष्टी विधानसभा ४६२०० केज विधानसभा ३९८५७ परळी विधानसभा २०१६२ भाजप सदस्य नोंदणी झाली आहे या अभियानाचे जिल्हा संयोजक नवनाथ शिराळे जिल्हाभरातील प्रदेश पदाधिकारी जिल्हा पदाधिकारी तालुका अध्यक्ष शक्ती केंद्र प्रमुख बुथ प्रमुख युवा मोर्चा महिला मोर्चा सोशल मिडीया विस्तारक दलित आघाडी भटके विमुक्त आघाडी कामगार मोर्चा सर्व स्तरातील कार्यकर्ते यांनी या नोंदणी अभियानात सक्रिय सहभाग घेऊन नोंदणी केली आहे सहा विधानसभा मतदार संघात अनेक कार्यकर्ते व नेत्यांनी वैयक्तिक १००० सदस्य नोंदणी केली आहे यात प्रामुख्याने ना.पंकजाताई मुंडे माजी खा.प्रितमताई मुंडे आ.नमितााताई मुंदडा नंदकुमार मुंदडा अदित्य सारडा शंकर देशमुख अशोक लोढा प्रशांत पाटील सुरेश हात्ते भुषण पवार अरुण राऊत सतिष मुंडे पवन मुंडे डॉ अशोक तिडके भागवत येवले ज्ञानेश्वर मुंडे अशा अनेकांनी केली आहे दि.१९ फेब्रुवारी पर्यंत हे नोंदणी अभियान सुरु असणार या लवकरच बीड जिल्हा २ लाख सदस्य पार करेल असा विश्वास व्यक्त करुन प्रत्येक बुथवर ५ सक्रिय सदस्य नोंदणी जिल्ह्यात करण्या येणार आहे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे या नोंदणी बद्दल ना.पंकजाताई मुंडे यांनी व आ.सुरेश धस आ.नमितााताई मुंदडा यांनी अभिनंदन केले आहे

# संत रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज जयंती महोत्सवास उपस्थित रहा- हरिभाऊ सवणे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ फेब्रुवारी**

तालुक्यात गेल्या ३५ वर्षापासून संत शिरोमणी गुरु रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे यावर्षी सार्वजनिक एकत्रित जयंती महोत्सव साजरा करण्यात येणार आहे तरी या जयंती महोत्सवास उपस्थित राहावे असे आवाहन जयंती कमिटीचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.




प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संत रविदास महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे तसेच या जयंतीनिमित्त पद्माकर कांबळे (पी.के.) यांच्या वतीने उपहार ची व्यवस्था करण्यात आली आहे या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश (दादा) सोळंके उद्घाटक मोहन (दादा) जगताप हे लाभणार आहेत तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी या जयंती महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती कमिटीचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे, उपाध्यक्ष एड. गणेश,गवळी सचिव योगेश शिंदे, कार्याध्यक्ष भगवान सोनवणे, सदस्य वसंत वाघमारे, निमंत्रक राष्ट्रीय चर्मकार संघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके व भाजपा अनुसूचित जाती जमाती उपाध्यक्ष सत्यनारायण उणवने आयोजक राजेश जाधव,सचिन कांबळे, सुभाष कांबळे, संतोष जाधव,प्रसाद वाघमोडे, आश्विन खंडागळे, राधाकिसन भाळशंकर, आकाश कांबळे, एड. दत्ता जाधव,विकी मराठे, प्रीतम जाधव,मयूर वाघमारे, संतोष खंडागळे,अर्जुन पोहेकर यांनी आवाहन केले आहे

## संक्षिप्त वृत्त

### माघ पौर्णिमेनिमित्त दत्त संस्थान बालाघाट येथे संगीत भजनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ फेब्रुवारी**



श्री दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे परमपूज्य सद्गुरु प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने व दत्त उपासक श्रीहरी वैजिनाथ महाराज यांच्या अधिपत्याखाली बालाघाट डोंगर परिसरात श्री दत्त संस्थान कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे प्रत्येक पौर्णिमेला विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. माघ पौर्णिमेनिमित्त बुधवार दि.१२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी नऊ ते अकरा यावेळी संगीत भजनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या संगीत भजनामध्ये संगीत क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची हजेरी राहणार आहे तसेच दत्तमूर्ती महाभिषेक, महारुद्राभिषेक यानंतर दुपारी बारा वाजता महाआरती होऊन होणार आहे तरी या सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे संस्थांचे दत्त उपासक श्रीहरी वैजिनाथ महाराज शिंदे यांनी केले आहे. या पौर्णिमेनिमित्त गणेश महादेव उनवणे, शिवाजी दत्तू बोबडे यांचा महाप्रसाद होणार आहे. तरी सर्व भावीक भक्तांनी या कार्यक्रमाचा महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

### जिल्ह्याला अभिमान वाटेल असंच काम माझ्या हातून होईल-ना.पंकजा मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ फेब्रुवारी**

पालकमंत्री असताना जिल्ह्यासाठी माझा प्रत्येक क्षण न क्षण उपयोगात आणला. विकासाबरोबरच समाजातील वंचित पिडित घटकांना न्याय देण्याचे काम केले. आता देखील मला जे खाते मिळाले आहे, त्यातून जिल्हयाला अभिमान वाटेल असेच काम माझ्या हातून होईल असं राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितलं. माझ्या बोलण्याचा चुकीचा अर्थ काढू नका. मी कशाला नवा पक्ष काढेल? असा खडा सवाल त्यांनी यावेळी केला.

महासांगवी येथे श्रीसंत मीराबाई आईसाहेब यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह, पंचकुंडी महायज्ञ आणि श्री भगवान शंकराच्या मूर्ती प्राण प्रतिष्ठेच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. मीराबाई संस्थानच्या मठाधिपती ह.भ.प.राधाताई सानप, उद्योजक विवेक देशपांडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, विजय गोल्हार, मधुकर गर्जे, महेंद्र गर्जे, अजय धोंडे, अनुरथ सानप, सूर्यभान बरके आदी यावेळी उपस्थित होते.ना.पंकजा म्हणाल्या, राधाताई सानप महाराज जरी आध्यात्मिक क्षेत्रात असल्या, कीर्तनकार असल्या तरी त्यांच आणि माझं मैत्रीणीचं नात आहे. लोकनेते मुंडे साहेबांपासून मी याठिकाणी दरवर्षी येते ते केवळ आपल्या माणसांसाठी.. राजकारण आणि धर्मकारण यात काम करणारांनी समाजाच्या भल्यासाठी हातात हात घालून काम करण्याची गरज आहे. राष्ट्रसंत भगवान बाबा यांनी समाजावर केलेले संस्कार विसरून चालणार नाही, त्यांचं सत्व आणि तत्व खूप मोठं होतं. संपूर्ण जीवन समाजाला वाहून देणं एवढं सोप काम नाही असं सांगत माझी भगवान बाबांवर नितांत श्रध्दा आहे, डोळे बंद केले तरी मला ते साक्षात समोर असल्याची जाणीव होते असं त्या म्हणाल्या.

# बीड शहर सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सत्येंद्र पाटील,उपाध्यक्षपदी हाजी नसीम इनामदार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ फेब्रुवारी**

बीड शहर सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते सत्येंद्र पाटील यांची तर उपाध्यक्षपदी हाजी इनामदार यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर अध्यक्ष उपाध्यक्ष यांचा प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्वागत सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी राजेंद्र मस्के, अशोक रोमण, प्रा.विजय पवार, मिरगणे सर, माजी प्राचार्य अनंत नखाते सर, ज्येष्ठ शिक्षक नेते कल्याण वाघमारे सर, रामनाथ डाके सर, अप्पासाहेब रसाळ सर बाळासाहेब गोरे, बंडु कदम, झुंजार धांडे, राजेंद्र साळुंके, जयमल्हार बागल, विशाल तांदळे, दिपक हजारे, मिठ्ठन कोटुळे, दत्ता साळुंके, अभय बीडकर, सचिन हरनमारे, वल्लभ चिरके, गणेश लोंढे, अभिजीत मसकर, पप्पू लांडे, दत्ता कशिद, सुरेश खुर्णे, वामन घोडके, महेंद्र शिराळे यांच्यासह अनेक शिवप्रेमींची उपस्थिती होती.

बीड शहरात गेल्या काही वर्षापासून अत्यंत उत्साहात सार्वजनिक शिवजयंती उत्सव साजरा केला जातो. सबंध बीडकर नागरिक या शिवजयंती सोहळ्यामध्ये सहकुटुंब, सहपरिवार सहभागी होत असतात. यंदाही बीडचा हा सार्वजनिक शिवजयंती उत्सव सोहळा आ. संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सर्व सहकारी, पदाधिकारी, मित्र परिवाराच्या वतीने अत्यंत आनंददायी वातावरणात उत्साहात साजरा केला जाणार आहे. या सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड तसेच शिवजयंतीच्या अनुषंगाने चर्चा व विनिमय करण्यासाठी आणि शिवजयंती उत्सवामध्ये यावर्षीच्या आयोजित कार्यक्रमासंबंधी निर्णय घेण्यासंदर्भात दि. १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता शहरातील शासकीय विश्रामगृहात सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती कार्यकारिणीच्या व्यापक बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते. आ. संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते सत्येंद्र पाटील यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी हाजी नसीम इनामदार यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीला शिवप्रेमी नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# व्यक्तिमत्व विकासासाठी खेळ महत्त्वाचा

## भारतीय महिला खोखो टिम विश्वचषक स्पर्धा विजेती कर्नधार प्रियंका इंगळे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ फेब्रुवारी**

येथील योगेश्वरी महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने उद्घाटन प्रसंगी भारतीय खो-खो विश्वचषक विजेत्या महिला संघाच्या कर्णधार प्रियंका इंगळे यांनी उद्घाटक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. येथून जवळच असलेल्या कळंबअंबा या खेड्यातून आलेल्या कुटुंबातून प्रियंकाने देशाचे नेतृत्व करत कमी वयात यश संपादन केले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.चंद्रशेखर बर्दापूरकर हे उपस्थित होते त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना हा विद्यार्थ्यांचा जडणघडणीचा काळ आहे विविध क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर मेहनत व चिकाटी यांच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन घेऊन आतापासूनच तयारीला लागा असे आवाहन करत प्रियंका इंगळे यांच्यापासून आपण हीच प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले.स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने कळंब येथील प्रख्यात कवी प्रा.शेखर गिरी, युवा गझलकार सचिन क्षीरसागर हेही याप्रसंगी उपस्थित होते. त्यांनी विविध कविता, मराठी गझल व शेरोशायरी सादर करत विद्यार्थ्यांना अंतर्मुख केले.




संस्थेचे उपाध्यक्ष श्री.गणपत व्यास गुरुजी यांनीही एक उदबोधनपर कविता सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कानेटकर यांनी केले.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव कमलाकरराव चौसाळकर, कार्यकारी उपाध्यक्ष ड. जगदिश चौसाळकर, संचालक माणिकराव लोमटे,अंगदराव कराड, प्रताप पवार, रमन सोनवळर, माजी आमदार रोमन साठे, उपप्राचार्य डॉ. आर. व्ही. कुलकर्णी, स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. डॉ. अनिल नरसिंगे, गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.व्ही.जी. कळलावे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. श्रावणी तारसे, कु.दिव्या पौळ, कु.वैष्णवी जाधव यांनी केले.आभार प्रदर्शन स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. अनिल नरसिंगे यांनी केले.उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या सुवर्णरत्न पुरस्कारांचे शनिवार, दिनांक २२ फेब्रुवारी रोजी वितरण

### शिवकुमार निर्मळे, सुधाकर देशमुख, वर्षाताई मुंडे, विद्याधर पंडित यावर्षीच्या पुरस्कारांचे मानकरी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ फेब्रुवारी**




येथील संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणा-या सुवर्णरत्न पुरस्कारांचे वितरण यावर्षी शनिवार, दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात येणार आहे. यावर्षी हे पुरस्कार शिवकुमार निर्मळे (पत्रकारिता), वृक्षमित्र सुधाकर देशमुख (सामाजिक), वर्षाताई मुंडे (शैक्षणिक) आणि विद्याधर पंडित (कला) यांना जाहिर झाले आहेत. तरी या पुरस्कार वितरण सोहळ्यास व सांस्कृतिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेचे कार्यवाहक प्रा.कैलास भागवत चोले यांनी केले आहे.

येथील संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षीच सुवर्णरत्न पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येते. यावर्षी मंगळवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता मुकूंदराज सांस्कृतिक सभागृहात पुरस्कारांचे वितरण व संकल्प विद्या मंदिर शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रम ही आयोजित करण्यात आलेला आहे. या पुरस्कारांचे वितरण करण्यासाठी डॉ.विठ्ठलराव लहाने (सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन) हे तर उद्घाटक म्हणून डॉ.नरेंद्र काळे (सचिव, बनेश्वर शिक्षण संस्था) तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय गंभीरे (माजी नगरसेवक न.प.अंबाजोगाई) तर प्रमुख अतिथी म्हणून शेख चाँद (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अंबाजोगाई), ऍड.राजेंद्रप्रसाद धायगुडे( ज्येष्ठ विधी तज्ज्ञ जिल्हा सत्र न्यायालय अंबाजोगाई) विशाल जाजू (चेअरमन, आर.डी.देशपांडे नागरी सहकारी पतसंस्था), दगडू लोमटे (प्रमुख सुवर्णरत्न पुरस्कार वितरण समिती) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच ज्येष्ठ पत्रकार शिवकुमार निर्मळे, वृक्षमित्र सुधाकर देशमुख, शिक्षणतज्ज्ञ वर्षाताई मुंडे, प्रख्यात चित्रकार विद्याधर पंडित या मान्यवरांना त्यांनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'सुवर्णरत्न पुरस्कार-२०२५' देवून सन्मानित करण्यात येणार आहे. तरी या पुरस्कार वितरण सोहळ्यास व सांस्कृतिक कार्यक्रमास आपण जरूर उपस्थित रहावे असे अवाहन संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या सचिव प्रा.कैलास भागवत चोले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रेखा सुभाष बडे, सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमती घाडगे प्रिया, श्रीमती अनिता कुलकर्णी व संकल्प परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुंबई-पुणे मिसिंग लिंक लवकरात-लवकर पूर्ण करा- सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना साकोरे

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-:** सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरील महत्वाकांक्षी मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. या दौऱ्यात त्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि लवकरात लवकर काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

या दौऱ्यादरम्यान महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या () पुणे विभागातील अधिक्षक अभियंता राहुल वसईकर, कार्यकारी अभियंता राकेश सोनवणे तसेच प्रकल्प सल्लागार, कंत्राटदार आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आणि ऑगस्ट २०२५ अखेर प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, प्रकल्प दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावा यासाठी अधिकाऱ्यांना निर्देश दिले. मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील बोरघाटात वाहतूक कोंडी आणि अपघात होतात. तसेच, पावसाळ्यात येथे दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे वाहतुकीला अडथळे येतात. हे लक्षात घेऊन, हा नवीन मार्गिका प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. मिसिंग लिंक प्रकल्प पूर्ण झाल्यास मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सोयीस्कर होईल, असा विश्वास राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला. एकूण सुधारित मार्ग: खालापूर ते खोपोली इंटरचेंज आणि खोपोली एक्झिट ते कुसगाव (सिंहगड संस्था) दरम्यानचा भाग आहे. यामध्ये सध्याचे १९ किमीचे अंतर ६ किमीने कमी होऊन १३.३ किमी इतके होणार आहे. प्रवासाच्या वेळेत २०-२५ मिनिटांची बचत,इंधन बचत आणि वायू प्रदूषणात घट,घाट रस्त्यावरील वाहतूक कोंडी आणि अपघातांची शक्यता कमी होण्यास मदत होणार आहे.



## मुलाची भेट घडवा वडिलांनी दिले निवेदन

**पाथरी,/प्रतिनिधी :** पाथरी



### सुनेच्या नातेवाईकांनीच केले माझ्या मुलाला गायब

तालुक्यातील बाबुलतार येथील वयोवृद्ध रहिवासी भागोजी नामदेव डोंगरे यांनी पाथरी पोलीस स्टेशनला एक अर्ज दिला असून या अर्जामध्ये माजी व मुलाची भेट घडून देण्याची मागणी केली आहे

त्यांनी दिलेल्या निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की माझा मुलगा नातेवाईकांनी लपवून ठेवला आहे व मला त्याची भेट घेऊ दिली जात नाही यामध्ये माझी सून व त्यांचे नातेवाईक समाविष्ट असून त्यांनी कट कारस्थान करत माझ्या मुलाला माझ्यापासून दूर केले आहे .

मुलगा डॉक्टर असून देखील मला त्याची भेट घेऊ दिली जात नाही याप्रकरणी भागोजी नाम देव डोंगरे यांनी दिनांक २७ जानेवारी रोजी पाथरी पोलीस स्टेशनला एक अर्ज दिला आहे परंतु यावर अद्याप कुठलीही कारवाई झाली नाही यामुळे याप्रकरणी पाथरी पोलीस यांनी कार्यवाही करावी नसता मला वरिष्ठाकडे दाद मागावी लागेल असे देखील नमूद करण्यात आले आहे या निवेदनामध्ये सतीश सदावर्ते महेश सदावर्ते कैलास सदावर्ते मारुती सदावर्ते गुंफाबाई आधीवर डोंगरे यांनी आरोप केले आहेत व न्याय देण्याची मागणी केली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### अखिल स्तरीय महा ई सेवा आधार केंद्र संघटन महाराष्ट्र राज्य जिल्हाध्यक्षपदी पंडीत



**परभणी ,/प्रतिनिधी :** अखिल स्तरीय महा ई सेवा व आधार केंद्र संघटन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिनांक ९ व १० फेब्रुवारी दोन दिवस राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन पालघर व मुंबई येथे करण्यात आले होते .

या बैठकीमध्ये परभणी जिल्हाध्यक्ष पदी इंजि. सुहास पंडित व महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी म्हणून संतोष भावानकर यांची नियुक्ती करण्यात आली.सदरील नियुक्ती पत्र मा.विनोद तायडे, शैलेन्द्र भोईटे , यशवंत गावंडे, रियाज तांबोळी, कुंदन कोरडे जयश पाटील व कामिनी रानडे यांच्या उपस्थित देण्यात आले. महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यातील महा ई सेवा व आधार केंद्र पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता.ही महत्वपूर्ण बैठक हॉटेल रमणीय रेसिडेन्सी, केळवा, ता. जि. पालघर येथे पार पडली. बैठकी मध्ये महा ई सेवा व आधार केंद्रांसमोरील अडचणी, सवलती, शासन धोरणे आणि भविष्यातील वाटचाल यासंदर्भात चर्चा करण्यात आली. परभणी जिल्ह्यातील केंद्राचालकाच्या न्याय व हक्कासाठी संघटनेच्या माध्यमातून सर्वांना सोबत घेऊन संघर्ष करणार तसेच शासनाच्या सर्व अधिकारी कर्मचारी यांच्या सोबत समन्वय ठेवून व शासकीय नियमाचे काटेकोरपणे पालन करत जिल्ह्यातील नागरिकांना सेवा पुरवणार असे विचार सुहास पंडित यांनी मांडले. कार्यक्रमास राज्यातील विविध जिल्ह्यातील संघटनेचे राज्य प्रतिनिधी, जिल्हा अध्यक्ष व महा इतर पदाधिकारी उपस्थित होते.


### चढावर चढतांना बस आली माघारी



**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर येथून ८० प्रवासी घेऊन एस टी बस कावी कडे जात असतांना रस्त्यात शेवडी च्या पुढील भोसी रस्त्यावरील चढावर बस माघारी येत असल्याने चालत्या बस मधून प्रवाश्यानी दारातून उडया मारून खाली उतरले व बस रस्त्याच्या खाली उतरली या अपघातात काही प्रावश्यना किरकोळ मार लागल्याची घटना सोमवार दि १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास भोसी रस्त्यावर घडली. या बाबत अधिक माहिती अशी की जिंतूर आगाराची बस क्रमांक एम एच २० बी एल ०५८८ ही ८० ते ९० प्रवासी घेऊन कावी कडे जात होती शेवडी पाटी ओलांडल्यानंतर भोसी कडे जाण्यासाठी चढ चढावा लागतो या चढावर बस चढत असताना अचानक बस माघारी यायला लागली घाबरून काही प्रवाश्यानी चालत्या बस मधून खाली उडया मारल्या.बस चालकाने ब्रेक मारून बस थांबवण्याचा प्रयत्न केला परंतु बस न थांबता पाठीमागून येणाऱ्या जिंतूर ते सावरगाव कडे जाणाऱ्या एम एच १४ बी टी २१६३ या बस ला धडकली या बस मध्ये जवळपास ७० प्रवासी होते. त्या नंतर कावी कडे जाणारी बस ही रस्त्या खाली उतरली जिंतूर आगारात नादुरुस्त बसेस चा भरणा जिंतूर अगार एकेकाळी जिल्ह्यात सर्वात जास्त नफा कमावणारे आगार म्हणून प्रसिद्ध होते ओरतु तालुक्यातील ग्रामीण भागाला जोडणाऱ्या रस्त्याची दुर्दशा झाल्याने बसेस ही खिळखिळ्या झाल्या असून जिंतूर परभणी सारख्या चकचकीत रस्त्यावर दररोज बसेस नादुरुस्त होण्याच्या घटना घडत आहेत तर ग्रामीण भागातील बसेस च्या दुर्दशे बाबत न बोललेच बरे

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## जिल्हयात बारावी परिक्षांना सुरुवात



परभणी-उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) आजपासून सुरु झाल्या. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी आज श्री ज्ञानोपासक महाविद्यालयातील परीक्षा केंद्रास भेट देऊन पाहणी केली.

## जोधपूर येथील राष्ट्रीय लॅक्रॉस स्पर्धेत महाराष्ट्रास कांस्य पदक

**सेलू,/प्रतिनिधी-** भारतीय लॅक्रॉस फेडरेशन ऑफ इंडिया व राज्यस्थान लॅक्रॉस असोसिएशन वतीने आयोजित ३री राष्ट्रीय सिनिअर लॅक्रॉस क्रीडा स्पर्धा दि.७ते ९ फेब्रुवारी दरम्यान उदयपूर राजस्थान येथे आयोजित करण्यात आल्या होत्या या स्पर्धेत सबज्युनिअर महाराष्ट्र राज्य मुलांच्या संघाने कास्य पदक पटकावले .

या संघाचा कर्णधार गोपीनाथ कंठाळे ,निनाद चोघुले ,वेदांत मगर ,करण गोरे, सागर आडणे, ओम नेमाडे ,कार्तिक खिस्ते ,अभय वाघ, आदित्य खिस्ते, प्रणव घोडके, निशांत सोनवणे, दिशांत राउत, वरद मगर ,सिद्धार्थ बच्छाव, अजय चव्हाण साईनाथ दराडे आर्णव वाव्हळे, साहिल वाव्हळे, आदित्य महाशिवदळे ,ओम काकडे ,या खेळाडुंचा समावेश होता .

या यशाबद्दल महाराष्ट्र लॅक्रॉस असोसिएशन अध्यक्षा सुमेधा ठाकूर महाराष्ट्राचे सचिव मोहम्मद बाबर, परभणी जिल्ह्याचे अध्यक्ष संतोष कठाळे, परभणी जिल्ह्याचे उपाध्यक्ष गणेश माळवे, सचिव प्रशांत नाईक, राजू कोळी ,विशाल पवार, तांत्रिक समिती प्रमुख जबाक , संतोष शिंदे यांनी अभिनंदन केले या संघास प्रशिक्षक राहुल घाडगे सह. प्रशिक्षक कुणाल चव्हाण व्यवस्थापक सत्यम बरकुले यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सर्व स्तरावरून शुभेच्छा व कौतुकाचा वर्षाव होत.



## एसटी सुरक्षा रक्षका कडून हरवलेले ३५००० रु किंमतीचे झुंबर परत- महिला प्रवाशाकडून समाधान व्यक्त

**जिंतूर,/प्रतिनिधी-** परभणी-जिंतूर एम एच-२० २३१४ प्रवासा दरम्यान सौ.अनिता राहुल गायकवाड रा.औरंगाबाद यांचे कानातील तीन पदरी सोन्याचे झुंबर अंदाचे किंमत ३५००० रु किंमतीचे एसटी मध्ये पडले असता ते आगारात आलेल्या एसटीतुन शोधून सुरक्षा रक्षक शेख समी यांनी त्यांचे भाऊ प्रवीण वाकळे (रा. अंबरवाडी ता.जिंतूर) शहानिशा करून परत केले.



हरवलेले झुंबर परत मिळाल्या बद्दल प्रवाशी महिला सौ.अनिता गायकवाड यांनी समाधान व्यक्त केले.

या वेळी इंधन लिपिक गुणीरत्न वाकोडे यांचीही उपस्थिती होती.

या पूर्वीही कित्येक प्रवाशी वर्गांच्या प्रवासा दरम्यान हरवलेल्या किंमती विविध वस्तू,सुरक्षितपणे ज्या-त्या प्रवास्यास जिंतूर सुरक्षा रक्षका तर्फे शहनिशा करत परत दिलेल्या आहेत.

प्रत्येक प्रवाश्यानी प्रवासा दरम्यान अंगावरील किंमती दागदागिने, किंमती वस्तू याची नीट काळजी घेण्याचे आव्हान वेळोवेळी केले जात असते.

## ई-केवायसी करणे बंधनकारक, नसता धान्य होणार आता बंद- तालुक्यात ५४ हजार लाभार्थ्यांची केवायसी पेंडीग

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी:** धान्य वितरणात पारदर्शकता आणण्यासाठी शासनाकडून रेशन कार्ड धारकांचे ई-केवायसी करण्यात येत आहे. याकरीता तालुका पुरवठा विभागाकडून वेळोवेळी सुचना देण्यात येऊनही आजपर्यंत केवळ ५६ टक्के केवायसी पूर्ण झाली आहे. त्यामुळे लाभार्थींना दिलेल्या मुदतीत केवायसी पूर्ण केली नाही तर अशा लाभार्थींना रेशनचे धान्य बंद करण्याच्या हालचाली शासन स्तरावर सुरू असल्याची माहिती आहे. तालुक्यातील १२१ स्वस्त धान्य दुकानांमधून अंत्योदय शिधापत्रिका धारक ५५३३ तर प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकांची संख्या २१६३८ व त्यामधील अशी एकुण सदस्य संख्या १२४९१८ इतकी आहे. यानुसार धान्य कोटा मंजुर होऊन या सर्व लाभार्थींना

धान्याचे वितरण करण्यात येते. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील शिधापत्रिकेतील व्यक्ती आणि आधार क्रमांक त्याच व्यक्तीचे असल्याची खात्री करण्यासाठी तसेच शंभर टक्के ई-केवायसी करण्याची सुविधा ई-पॉस मशिनवर उपलब्ध करून दिली आहे. तालुक्यात अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील असे असलेले एकुण १२४९१८ लाभार्थी, यातील ५४९६१ लाभार्थीचे ई-केवायसी प्रलंबित आहे. या लाभार्थींनी मुदतीत ई-केवायसी केली नाही तर रेशन दुकानातील धान्य बंद केले जाऊ शकते. शासनाच्या योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी लाभार्थींनी ई-केवायसी करून घेणे गरजेचे आहे.

### ई-केवायसी प्रक्रिया कशी करावी ?

ई-केवायसी करण्यासाठी ग्राहकांनी आपल्या गावातीलच रेशन दुकानाशी संपर्क साधावा. त्यानंतर कुटुंबातील प्रत्येक सदस्यांचे डिजिटल यंत्रामध्ये आधार क्रमांक अपडेट करून पार केली जाईल. ही प्रक्रिया निशुल्क आहे. जितक्या सदस्यांचे आधारकार्ड सादर झाले, तितक्याच सदस्यांचे रेशन कार्डावर उपलब्ध होणार आहे. ही प्रक्रिया गावपातळीवर स्वस्त धान्य दुकानदार पार पाडीत आहेत.

### ई केवायसी करणे बंधनकारक

शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांनी आधारकार्ड जोडणीसह रास्तभाव दुकानात समक्ष हजर राहून ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी. जे शिधापत्रिकाधारक ई-केवायसी पूर्ण करणार नाहीत. अशा धारकांचा धान्य पुरवठा सुरू ठेवण्यास अडचण येऊ शकते.वेळोवेळी ई केवायसी साठी शासनस्तरावरून मूदत वाढ देण्यात येत आहे मात्र लाभार्थी केवायसी करून घेत नसल्याने धान्य पूरवठा करण्यात आडचण निर्माण होवू शकते.तरी लाभार्थ्यांनी तात्काळ ई केवायसी करून घ्यावी.
- डॉ.शिवाजी मगर, तहसीलदार सेतू

लाभार्थीचे ई-केवायसी पूर्ण शासनाने ई-केवायसी करण्यासंदर्भात वेळोवेळी मुदत वाढवून दिली आहे. परंतु, अद्यापही तालुक्यात ५४९६१ लाभार्थी बाकी आहेत. ६९९५७जणांची ई-केवायसी झाली आहे. मुदतीत ई-केवायसी न झाल्यास अशा लाभार्थीचे धान्य बंद होण्याची शक्यता आहे.

## शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रातील नवतंत्रज्ञान अवगत करावे- कुलगूरू डॉ.मणि

**परभणी,/प्रतिनिधी-** गौतम बुद्धांचे प्रज्ञा, शील व करुणा आणि महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेनेचा तसेच शिक्षणाच्या विचाराचा अवलंब शेतकऱ्यांनी करावा आणि कृषी क्षेत्रातील नवतंत्रज्ञान अवगत करून परस्पर सहकार्य वाढवण्यासाठी संघटित होऊन आपल्या जीवनात उन्नती साधावी, असे आवाहन कुलगुरु डॉ. इंद्र मणि यांनी केले.



वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या नांदेड येथील कापूस संशोधन केंद्राद्वारे शेतकरी प्रशिक्षण व निविष्ठा वाटप कार्यक्रमाचे आयोजन १० फेब्रुवारी रोजी मौजे अंबाडी (ता. किनवट) येथे करण्यात आले होते. हा कार्यक्रम विद्यापीठातंर्गत असलेल्या भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या अखिल भारतीय कापूस संशोधन परियोजनेच्या 'अनुसूचित जाती उपयोजना' अंतर्गत राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इन्द्र मणि होते. विशेष अतिथी म्हणून संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, नांदेडचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, सरपंच श्रीमती शीतल जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना कुलगुरू इन्द्र मणि यांनी नांदेड येथील कापूस संशोधन केंद्राची गौरवशाली परंपरा असून, देशी व अमेरिकन कापसाचे अनेक संकरीत व सरळ वाण येथे विकसित करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांनी या संशोधन केंद्राच्या शास्त्रज्ञांशी नियमित संपर्क ठेवावा, असे म्हटले. संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनीही शेतकऱ्यांना कापूस उत्पादनात सुधारणा करण्यासाठी विविध आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. विद्यापीठ हे सदैव शेतकाऱ्यासाठी तंत्रज्ञान प्रसारासाठी कटिबद्ध असून शेतकऱ्यानी त्याचा उपयोग करावा, असे नमूद केले.

बालाजी मुंढे यांनी महाराष्ट्र शासन, कृषि विभाग यांच्या विविध उपक्रमाची माहिती दिली व शासन सदैव शेतकऱ्याच्या हितासाठी प्रयत्नशील राहील अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाचे प्रास्तविक सहयोगी कृषी विद्यावेत्ता डॉ. अरविंद पांडागळे यांनी केले. या कार्यक्रमादरम्यान निविष्ठा वाटपाचा लाभ सहभागी १२० शेतकऱ्यांनी घेतला. उपस्थित मान्यवरांनी शेतकऱ्यांच्या शंका समाधान करून त्यांना योग्य मार्गदर्शन दिले. हा कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरला असून भविष्यातही अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी मागणी उपस्थित शेतकऱ्यांनी केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेमानंद कानिंदे यांनी केले तर आभार योजनेचे समन्वयक डॉ. बस्वराज भेदे यांनी मानले. यावेळी संशोधन उपसंचालक डॉ. गजेंद्र जगताप, विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. पावन ढोके, डॉ. संजय देवकुळे, उपविभागीय कृषी अधिकारी राजकुमार रणविर तसेच विद्यापीठाचे शास्त्रज्ञ आणि कृषि विभागाचे अधिकारी बहुसंखेने उपस्थित होते.

# सरसकट कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांचे अर्धनग्न आंदोलन

## विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांची अर्धनग्न दिंडी मंत्रालयावर धडकणार




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ फेब्रुवारी**
शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करण्याच्या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन करीत निदर्शने केली. मानखुर्द ते मंत्रालयापर्यंत विविध मागण्यांसाठी शेतकरी पायी रवाना होणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी यावेळी दिला आहे.
शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले परंतु सरकार स्थापन होऊनही अद्याप कर्जमाफी झाली नाही. त्यामुळे कर्जाला कंटाळून तसेच आर्थिक विवंचनेतून शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. शेतमालाला भाव मिळत नसल्याने शेतकरी हैराण झाला आहे. त्यामुळे शासनाने तत्काळ कर्जमाफी करून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, सरसकट पीकविमा द्यावा, सोयाबीन, कापसाला अनुदान द्यावे, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा, पीक कर्जासाठी सिबीलची अट रद्द करावी, रोजगार हमीच्या कामाला सुरूवात करावी आदी मागण्यांचे निवेदन सादर करीत शेतकऱ्यांनी मंगळवार दि ११ फेब्रुवारी रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन करीत निदर्शने केली. यावेळी मागण्या तत्काळ मंजूर न झाल्यास मानखुर्द ते मंत्रालयापर्यंत शेतकरी अर्धनग्न अवस्थेत पायी जाणार असल्याचा इशारा दिला आहे.

# सामाजिक एकता प्रस्थापित करण्यासाठी एकजूट व्हावे- श्रीकृष्ण कोकाटे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ फेब्रुवारी**
समाजात सामाजिक एकता प्रस्थापित करण्यासाठी सर्व जातीधर्माच्या लोकांनी एकजूट होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी क्रिकेट लिगच्या सामान्यांच्या उद्घाटन प्रसंगी केले.
शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने येथील संत नामदेव कवायत मैदानावर दि ११ फेब्रुवारीपासून क्रिकेट लिगच्या सामन्यांचे उद्घाटन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष जगजीतराज खुराणा, माजी उपनगराध्यक्ष बिरजू यादव, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, बाळू बांगर, उत्सव समितीचे अध्यक्ष ॲड उल्हास पाटील, भूषण देशमुख, शिवाजी मेटकर, कल्याण देशमुख, पत्रकार तसेच पदाधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.
यावेळी बोलतांना पोलिस अधीक्षक कोकाटे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वधर्मसमभावची शिकवण दिली. आपणही त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून सामाजिक सलोखा साधला पाहीजे. खेळाच्या माध्यमातून सामाजिक एकजूटता निर्माण होते. एकोप्याची भावना निर्माण होते. त्यामुळे सर्वांनी सामाजिक एकता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले पाहीजे असे मत व्यक्त केले.
सकाळी साडेसहा वाजता संत नामदेव क्रिकेट लिगला सुरूवात झाली. यावेळी पहिला सामना वकील संघ आणि महावितरण कंपनी यांच्यात झाला. महावितरणने वकील संघाचा पराभव केला आणि क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला आहे. दुसरा सामना महसुल विभाग आणि पोलिस विभागाचा सामना झाला या सामन्यात पोलिस विभागाने महसूल विभागाला पराभूत करून क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला. बुधवार दि १२ रोजी पत्रकारसंघ आणि डॉक्टर असोसिएशनमध्ये तसेच वन विभाग आणि नगर पालिका यांच्यात क्रिकेट सामना होणार आहे.

# आदर्शमध्ये विद्यार्थी, पालकांचे समुपदेशन करून परीक्षेत स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ फेब्रुवारी**
येथील आदर्श महाविद्यालयातील इयत्ता बारावी उच्च माध्यमिक शालांत परीक्षा-२०२५ शुभारंभ इंग्रजी विषयाचे पेपर ने झाला आहे. परिक्षार्थी विद्यार्थी व पालक यांच्या मनावरील ताण कमी करण्यासाठी महाविद्यालयाच्यावतीने विद्यार्थी व पालकांना समुपदेशन करून त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.
यावेळी प्राचार्य डॉ. विलास आघाव परीक्षा विभाग प्रमुख प्रा. धनंजय जोशी, प्रा. दशरथ घुगे, मेजर पंढरीनाथ घुगे, प्रा अरुण पांपटवार, वर्षा सावतकर सीमा वाकोडे, वंदना तावडे, ज्योती मस्के, स्वप्ना पुपुलवाड, रचना पारीख, डॉ सुरेंद्र शाहू, प्रा.पंडित कु-हाडे, प्रा.विजयकुमार जट्टे, प्रा. दिनकर पवार, प्रा. राठोड,प्रा. विजय शिंदे, प्रा. होनराव, प्रा. सोळंके, प्रा.कांबळे व बाहेरगावावरून आलेले पर्यवेक्षक, पोलीस, पालक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.
उच्च माध्यमिक बोर्ड परीक्षेचा पहिला पेपर असल्यामुळे पालक व विद्यार्थी यांच्या मनावर अतिरिक्त ताण आदर्श महाविद्यालयात उपस्थित असताना जाणवत होता. हा ताण कमी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी विद्यार्थी व पालकांना समुपदेशन केले.विद्यार्थ्यांची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात ही परीक्षा संपन्न होईल.विद्यार्थ्यांनी गैरमार्गाचा कोणताही अवलंब करण्याचा प्रयत्न करू नये. सनदशीर मार्गाने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणताही त्रास होणार नाही असे समुपदेशन महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदर्श महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



हिंगोली- येथील नगर परिषदेच्या टर्फ ग्राऊंडवर अग्रवाल बहु मंडळ आणि कयाल असोसिएटस यांच्यावतीने महिला प्रिमीयर क्रिकेट सामने घेण्यात आले. यावेळी महिला संघांनी यामध्ये सहभाग नोंदवला होता. यावेळी अग्रवाल बहु मंडळ आणि कयाल असोसिएटसच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. छाया- सुनील पाठक

# बोराळा साठवण तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची ग्रामस्थांना भिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ फेब्रुवारी**
तालुक्यातील बोराळा गावातील शेतकऱ्यांनी जलसंपदा विभागाच्या नवीन साठवण तलावासाठी जमिनी दिल्या परंतु या साठवण तलावाचे काम निकृष्ट झाल्याची भिती वाटत आहे. यामुळे त्यांच्या जमिनी धोक्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.
जलपसंपदा विभागाने मोठ्या रकमेचे आमिष दाखवून शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या. शेतकऱ्यांना मोबदल्यासाठी प्रशासनाकडे चकरा माराव्या लागल्या. गावकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली येणार असल्याने त्यांनी तलावासाठी परवानगी दिली परंतु आता त्याच तलावातील पाळू अतिशय निकृष्ट दर्जाची होत असल्यामुळे ती फुटल्यास अख्खा गाव पाण्याखाली जाईल अशी भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.या तलावाचा सांडवा निकृष्ट दर्जाचा बांधण्यात आला असून त्याला भेगा पडल्या आहेत. सिमेंट आणि रेती हाताने निघत आहे. शिकाऊ इंजिनियर उमेदवार काम पाहत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.
यापूर्वीही याच भागात दोन तलाव बांधण्यात आले होते. तेही निकृष्ट बांधकामामुळे अयशस्वी ठरले आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. आता या तलावाची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी शेतकरी संकटात सापडले आहेत. या तलावाचे काम कांट्रक्शन कंपनी लातूर यांना देण्यात आले आहे. वाळूचे आणि सांडव्याचे काम व्यवस्थित न झाल्यास काम बंद पाडू, असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे. जलसंपदा विभाग पूर, दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांसाठी सिंचनाची सोय उपलब्ध करण्यासाठी कार्यरत असतो परंतु बोराळा तलावाच्या बाबतीत त्यांची भूमिका संशयास्पद वाटत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### शिधापत्रिका धारकांनी ई-केवायसी करावी

हिंगोली- सार्वजनिक वितरण व्यवस्था प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच त्याअनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या सर्व पक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी देशात शंभर टक्के ई-केवायसी होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांसाठी रास्त भाव दुकान स्तरावर ई-केवायसी प्रमाणिकरण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांनी आपण व आपल्या कुटुंबियासोबत आपल्या शिधापत्रिकेत असलेल्या सर्व व्यक्तींचे आधारक कार्ड घेऊन त्याचे सत्यापन (व्हेरीफिकेशन) करुन घेणे सक्तीचे व बंधनकारक आहे. सत्यापन (व्हेरीफिकेशन) न केल्यामुळे कुटुंबातील व्यक्तींचे नाव वगळल्यास किंवा त्यांचे शिधा जिन्नस बंद झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी शिधापत्रिका धारकाची राहील. सत्यापन (व्हेरीफिकेशन) बंधनकारक असून आधार कार्ड व शिधापत्रिका ही आवश्यक कागदपत्रे घेऊन दि. २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत ई-केवायसी करुन घ्यावेत, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी , हिंगोली यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजाने कर्ज

हिंगोली- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. शाखा कार्यालय किनवट अंतर्गत कार्यक्षेत्रात नांदेड, परभणी व हिंगोली हे तीन जिल्हे येतात. या कार्यालयामार्फत अनुसूचित जमातीच्या सुशिक्षित बेरोजगारांना त्यांचे जीवन उंचावण्याकरिता स्वयंरोजगारासाठी कर्ज स्वरुपात अल्प व्याजदराने एनएसटीएफडीसी नवी दिल्ली यांच्या सहकार्याने विविध योजना राबविण्यात येत आहेत. यासाठी नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यासाठी लक्षांक देण्यात आले आहे. उपलब्ध लक्षांकानुसार अनुसूचित जमातीच्या इच्छूक सुशिक्षित बेरोजगारांनी संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने कर्ज प्रस्ताव दि. २० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत दाखल करावेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. असे किनवट येथील शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या शाखा व्यवस्थापकांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### जिल्ह्यात बारावीच्या परीक्षा सुरळीत सुरू



हिंगोली- आजपासून जिल्ह्यातील ४० परीक्षा केंद्रावर बारावीच्या परीक्षांना सुरूवात झाली असून सकाळी विविध परीक्षा केंद्रांवर पालकांसह विद्यार्थी उपस्थित झाले होते. परीक्षांसाठी परीक्षा केंद्रावर चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. इंग्रजीचा पहिला पेपर आज पार पडला असून जिल्ह्यात सुरळीत परीक्षांना सुरूवात झाली आहे.

# जलालदाभा ते निशाना पांदन रस्ता खुला करून देण्याची शेतकऱ्यांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ११ फेब्रुवारी**
औंढा नागनाथ तालुक्यातील जलालदाभा व तामटीतांडा शिवारात जलालदाभा ते सावरखेडा, जलालदाभा ते निशाणा पांदण रस्ता खुला करून देण्याच्या संदर्भामध्ये तहसीलदार हरीश गाडे यांना शेतकरी व ग्रामस्थांनी निवेदन दिले.
सदरील निवेदनामध्ये सविस्तर वृत्त असे आहे की,मौजे जलालदाभा व तामटीतांडा शिवारात येत आसुन जलालदाभा ते सावरखेडा पांदनरस्ता मधुन जलालदाभा ते निशाना गाव नकाशावर पांदन रस्ता दाखविलेला आहे. परंतु सदर सर्वे नं व गट नंबर मधील शेतकरी हा रस्ता होऊ देत नाहीत. सदरील रस्ता मातोश्री पांदन रस्ता या योजने मधुन ग्राम पंचायत जलालदाभा करित आहे.तरी हा रस्ता मौजे जलालदाभा ते निशाना पांदन रस्ता शेतकऱ्यांना ये-जा करण्यासाठी शेतीतील माल गावाकडे आणण्यासाठी फारच महत्वाचा आहे. तरी निवेदनाची दखल घेऊन शेतात ये-जा करण्यासाठी तसेच माल ने-आण करण्यासाठी सदर पांदन रस्ता मोकळा करुन दयावा अशी निवेदनाद्वारे शेतकरी व जलालदाभा ग्रामस्थांनी मागणी केली आहे. निवेदनावर जलालदाभा सरपंच सुदाम खोकले, दत्ता ठोंबरे, सखाराम खोकले, उमरअली चाऊस, पुंजाजी काशीदे, रामराव गारोळे, अंबादास जाधव शंकर राठोड, किसन खोकले, तुकाराम खोकले कानबा ठोंबरे, पांडुरंग खोकले, सुनील जाधव, सुंदर राठोड, गणाजी मोघे, विलास जवादे, संतोष देवकते आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# कोनाथा येथे शिवजयंती, रमाई जयंतीनिमत्त बैठक



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ११ फेब्रुवारी**
तालुक्यातील कोनाथा येथे १९ फब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती व रमाई जयंती निमित्त बैठक घेण्यात आली दोन्ही जयंती एकत्र काढण्याचा निर्णय घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय खंदारे, उपाध्यक्ष राजेंद्र एंगडे, सचिव सिद्धार्थ एंगडे, मार्गदर्शक धम्मपाल गायकवाड, कैलास अवचार, चंद्रकांत बेंडे सरपंच राजरत्न कुंटे, उपसरपंच ओमकार बेंडे, पत्रकार मारुती बेंडे, धीरज मोगले, विशाल गायकवाड, मिलिंद मस्के, नेमाजी कुंटे, बालाजी मस्के, मोहन लाडे, बालाजी सूर्यतळ आदींची उपस्थिती होती. जयंतीला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.

# पीएम विश्वकर्मा योजनेंतर्गत लघु उद्योजकांना कर्ज देण्यास बँकांची टाळाटाळ

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ११ फेब्रुवारी**
शासनाने राज्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पि.एम.विश्वकर्मा योजना सुरु करून बेराजगारांची नोंदणी करून घेतली होती. बेरोजगारांना बँका कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याची तक्रार निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात आली आहे.
सुक्ष्म, लघु उदयोजक होऊन जीवनमानउंचावण्यासाठी बऱ्याच महत्वाकांक्षीबेरोजगारांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून योजनेच्या नियमाप्रमाणे हिंगोली येथे उद्योजक प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षणात दिलेल्या सुचना प्रमाणे उदयोग उभारण्यासाठी ३५% सबसिडी असणारे कर्ज प्रकरणे



बँका कडे प्रस्ताव दाखल केले असता संबधीत बँक अधिकारी गरजु बेरोजगारांचे वेगवेगळे कारणे सांगत मानसिक खच्चीकरण करत आहेत. बेरोजगारांना अर्थीक आधार देण्यासाठी शासनाने सुरु केलेली पि.एम.विश्वकर्मायोजनेत कोटयावधी रूपयांचा निधी देण्यात आला आहे. त्यांना प्राप्त झालेले प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र फक्त भिंतीवर लावण्या पुरतेच आहे का असा सवाल बेरोजगार करीत आहेत.
जिल्हाधिकाऱ्यांनी सदर निवेदनाची दखल घेऊन गरजु प्रशिक्षण पूर्ण केलेल्या पात्र बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँकाना आदेशीत, सुचीत करावे अशी मागणी केली आहे निवेदनावर विकास टाकणखार, रामभाऊ टाकणखार, दिलीप तांबुसकर, अमोल पाचमसे, गंगाधर पोफलाईकर,.रमेशकोथमगीरे,प्रसादजगताप,राहुल वडधनकर, महादु गवारे, अंकुश राऊत, पांडुरंग तामसकर, शंकर पाचमासे, सखाराम कंधारकर संतोष पडघन, गणपत मुधोळकर, मुंजा जगताप यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

बैद्यनाथ नागपूर असली आयुर्वेद
पाईल्स (मुळव्याध) च्या त्रासापासुन त्रस्त?
सिड्पाईल्स टॅबलेट
मूळव्याध, बध्दकोष्ठता, फिस्टुला, गुदा मार्गातील सूज,दाह टोचल्या प्रमाणे वाटणे, खाज, असहनीय वेदना इ. त्रास दूर करणयास मदत करते.


अभयामृत
बऱ्याच काळापासून असलेल्या जीर्ण बध्दकोष्ठतेला दूर करुन पाचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते.

UIN-MP 1724
स्वस्थ पाचन, स्वस्थ जीवन
वैद्यकीय सल्ला : +91 844 844 4935
www.baidyanath.co